POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३३१ ● मुंबई, बुधवार, ०२ जूले २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## महाराष्ट्रात मराठीचीच सक्ती, पण हिंदीचाही अभिमान

### दबावाला बळी न पडता विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेऊ : मुख्यमंत्री

**■मुंबई। प्रतिनिधी :**

या महाराष्ट्रात सक्ती एकच आहे ती म्हणजे मराठी. मराठी शिकावीच लागेल. त्याचबरोबर आम्हाला हिंदीचाही अभिमान आहे. भारतातील प्रत्येक भाषेचा आम्हाला अभिमान आहे. पण इंग्रजीला पायघड्या घालायच्या आणि भारतीय भाषाला विरोध करायचा हे आम्ही सहन करणार नाही. समिती स्थापन केली आहे, कोणाच्याही दबाबावाल बळी न पडता महाराष्ट्राच्या विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेऊ असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. भाजपचं सरकार आल्यानंतर आम्ही मुंबईचा चेहरा बदलून दाखवला. पण तुम्ही मुंबईतील मराठी माणसाला हद्दपार करण्याचं काम केल्याची टीका फडणवीसांनी उद्धव ठाकरेंच नाव न घेता केली.

**पहिलीपासून १२ वी पर्यंत मराठीसोबत हिंदी आणि इंग्रजी सक्तीची करा हे उद्धव ठाकरेंच्या समितीनं सांगितलं**

तुम्ही केवळ मराठीच्या नावावर राजकारण करत राहिलात. पण त्या मराठी माणसाला घर देणारे आम्ही आहोत. बीबीडी चाळेत आम्ही त्याला घर दिले. धारावीमधील गरिब माणसाला घर देणारे आम्ही आहोत. निवडणुका आल्यानंतर यांना मराठी माणूस आठवतो. आपण जे केले त्याच्याचविरुद्ध बोलायच आणि जिंकलो असं सांगायचं असे म्हणत फडणवीसांनी ठाकरेंना टोला लगावला. नवीन शैक्षणिक धोरणासाठी उद्धव ठाकरेंच्या सरकारने जी समिती स्थापन केली होती, त्या समितीने पहिलीपासून १२ वी पर्यंत मराठीसोबत हिंदी आणि इंग्रजी सक्तीची करा हे उद्धव ठाकरेंच्या समितीने सांगितलं.

**आमचं नातं हिंदुत्वाचं**

मंत्री रविंद्र चव्हाण यांची आज भाजपचे प्रदेशाध्यक्ष म्हणून निवड झाली. या कार्यक्रमात फडणवीस बोलत होते. आपण संघटनपर्व पूर्ण करत नव्या प्रदेशाध्यक्षाची प्रक्रिया पूर्ण केली आहे. सर्व प्रदेशाध्यक्ष बघा कोणीही रक्ताचे नाहीत. आमचं नातं हिंदुत्वाचं आहे, विचारांचं आहे असे फडणवीस म्हणाले. इथे देशाचा देखील प्रमुख होऊ शकतो आणि चहा विकणारा देखील पंतप्रधान होऊ करतो. रविंद्र चव्हाण नगरसेवक झाले, महामंत्री झाले, आमदार झालेत, मंत्री झालेत. रविंद्र चव्हाण धाडसी आहेत, चिकाटीचे आहेत असे फडणवीस म्हणाले. एक तरी कोकणी प्रदेशाध्यक्ष झाला पाहिजे, आता ती कमतरता देखील चव्हाण यांनी भरुन काढली आहे असे फडणवीस म्हणाले. दिलेली जबाबदारी पूर्ण करणं, क्षणोक्षणी भाजपचा विचार करणं, २४/७ भाजपसाठी वाहणारे चव्हाण आहेत. चंद्रशेखर बावनकुळेंचे देखील अभिनंदन करेल, पायाला भिंगरी लावत पक्ष उभं करण्याचे काम त्यांनी केल्याचे फडणवीस म्हणाले. आपण फेक नॅरेटिव्हला थेट नॅरेटिव्हनं उत्तर दिलं. भाजप १३५ जागांवर निवडून आला, त्यामुळे बावनकुळे यांचे अभिनंदन. भाजप जगातला सर्वात मोठा पक्ष आहे. मोदीजींनी वैश्विक नेतृत्व तयार केलं आहे. या देशात गेल्या ११ वर्षात मोदीजींनी परिवर्तन आणलं आहे. २५ कोटी गरीबांना बाहेर आणण्याचे काम केल्याचे फडणवीस म्हणाले.




**महाराष्ट्राच्या हितासाठी राजकारण करणारे आम्ही आहोत**

कोणाची युती झाली पाहिजे, कोणाची अयुती झाली पाहिजे, याच्यासाठी राजकारण करणार आम्ही नाहीत. महाराष्ट्राच्या हितासाठी राजकारण करणारे आम्ही आहोत असे फडणवीस म्हणाले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शेतकरी समृद्ध झाला पाहिजे, युवांच्या हाताला काम मिळाले पाहिजे, राज्याच १६ लाख कोटींचे करार करुन राज्याला प्रथम क्रमांकावर आणल्याचे फडणवीस म्हणाले. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवायचे आहे. गरिब शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत आम्हीला पाणी पोहोचवायचं आहे असे फडणवीस म्हणाले. दुष्काळाला आम्हाला भूतकाळ करायचे आहे. २०१४ नंतर जे बोललो ते आम्ही करुन दाखवलो आहे. आम्ही बोलबच्चन देणारे नाहीत. भाषण मोठ मोठे करायचे आणि कर्तृत्व शून्य असे आमचे काम नाही. ये पब्लिक सब जाणती है असे फडणवीस म्हणाले. महायुतीचे तिनही पक्ष नवीन महाराष्ट्र घडवायला निघालो आहोत. मोदीजी तुमचे जे स्वप्न आहे विकसीत भारत करण्याचे त्याबरोबर विकसीत महाराष्ट्र करण्याचे स्वप्न देखील पूर्ण करु, महाराष्ट्राला देशातील सर्वोत्तम राज्य केल्याशिवाय राहणार नाही असे फडणवीस म्हणाले.

---

#### मुक्त विद्यापीठाच्या वर्धापन दिन पूर्वसंध्येस - काव्यसंध्या

### विशाखा काव्य पुरस्कार वितरण समारंभ संपन्न

**■नाशिक। प्रतिनिधी :**

**सत्य असत्याच्या मधल्या एका फटीत**
**लपून बसल्या आहेत काही गोष्टी.**
**ज्यांच्यापर्यंत ना आपल्या नजरेचं ऊन**
**पोचतं,**
**ना मताचं पाणी.**
**म्हणूनच की काय त्या फटीतून**
**कधीतरी डोकावणाऱ्या,**
**नाजूक फुलासाठी नावच नाहीये**
**आपल्यापाशी**

ही कविता महाराष्ट्रातील कुठल्या गाव शिवारातील कवीची नव्हे तर ती आहे पुणे शहरातील तेजस मोडक या कॉन्व्हेन्ट पिढीतील एका आश्वासक कवीची, जी मराठी भाषेला सुखद निश्चिती देणारी आहे. अतिशय भावगर्भ आशय मिताक्षरांतून देणारा हा कवी वेगळ्या कवितेसोबत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या 'विशाखा काव्य पुरस्कार'चा देखील धनी झाला आहे.

मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने सन २०२८ पासून सन २०२४ पर्यंतच्या राज्याच्या विविध भागातील एकूण २२ पुरस्कारार्थींना हा पुरस्कार विद्यापीठ वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येस विद्यापीठ मुख्यालयात उत्तरोत्तर रंगत गेलेल्या एका बहारदार काव्यमैफलीत देण्यात आला. सदर काव्यमैफल ही पुरस्कार विजेत्या कवींनी आपल्या स्वरचित कवितांनी सजवून आपली निवड किती सार्थ आहे हे सप्रमाण सिद्ध केले. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या शुभहस्ते व अध्यक्षतेखाली पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले, कुलसचिव श्री. दिलीप भरड, परीक्षा नियंत्रक श्री. भटूप्रसाद पाटील, कुसुमाग्रज अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे हे उपस्थित होते. विद्यापीठात आतापर्यंतच्या विशाखा काव्य पुरस्कार विजेत्या पुस्तकांचे स्वतंत्र दालन उभारण्यात येईल. तसेच ही पुरस्कार प्राप्त पुस्तके विद्यापीठ संकेतस्थळावर स्वतंत्रपणे ई - दालन करून कायमस्वरूपी जगभरातील साहित्यप्रेमींना उपलब्ध करून देण्यात येतील अशी घोषणा विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी याप्रसंगी केली.




या पुरस्कार विजेत्यांमध्ये सन २०१८ - प्रथम - तन्वी अमित (निष्पर्ण फांदीवरचे पक्षी), द्वितीय - संतोष आळंजकर (मातीत हरवल्या कविता) व तृतीय - मोहन शिरसाठ (नाही फिरलो माघारी), सन २०१९ - प्रथम - विशाखा विशाखा (तुमुल अंतरीचे) व संदीप शिवाजीराव जगदाळे (असो आता चाड), द्वितीय - विनायक पवार (नामुष्कीचे पिढीजात वर्तमान) व अनिल साबळे (टाहोरा) आणि तृतीय झ गजानन फुसे (दिवस बोलू देत नाहीत), सन २०२० - प्रथम - अक्षय शिंपी (बिनचेहऱ्याचे कभिन्न तुकडे), द्वितीय - देवा झिंजाड (सगळं उलथून टाकलं पाहिजे) व तृतीय - नामदेव कोळी (काळोखाच्या कविता), सन २०२१ - प्रथम - तेजस मोदक (तृष्णाकर्ष), द्वितीय - रमजान मुल्ला (अस्वस्थ काळरात्रीचे दृष्टांत), तृतीय - मेघराज मेश्राम (माणूस असण्याच्या नोंदी) व स्व. विवेक काटीकर (दिक्काल धुकं पसरलेले सर्वत्र), सन २०२२ - प्रथम - सरिता सदाशिव पवार (राखायला हवी निजखुण), द्वितीय - प्रवीण अक्कानवरू (औटघटकेची युगांतरं), तृतीय - अमोल विनायकराव देशमुख (आठ फोडा आन बाहेर फेका), सन २०२३ - प्रथम - तान्हाजी रामदास बोऱ्हाडे (जळताना भुई पायतळी), सन २०२४ - प्रथम - सुनीता डागा (तुझं शहर हजारो मैलांवर), द्वितीय - सागर जाधव जोपुळकर (माती मागतेय पेनकिलर) व गौतम राजू ढोके (दंगल होतेच कशी?) यांचा समावेश आहे. विद्यापीठातर्फे 'विशाखा काव्य पुरस्कार' प्रथमतःच प्रकाशित काव्यसंग्रहाला दिला जातो. द्विस्तरीय निवड पद्धतीने त्यासाठी तीन सर्वोत्तम काव्यसंग्रहाची निवड केली जाते. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाच्या पुरस्कारासाठी अनुक्रमे २१ हजार, १५ हजार व दहा हजार रुपयांचा धनादेश (दोन विजेते असल्यास धनराशी विभागून), प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

माणूसपणाचा विवेकबुद्धीने गौरव करणारा वाशिम येथून आलेल्या मोहन शिरसाट हा कवी. त्याची -

**फक्त कोणत्या क्षणी**
**कोणत्या स्थळी**
**काय करावं**
**याचे ठेवतो भान**
**अंतरंगात जपतो**
**माणसाचं टवटवीत हिरवं पान**

ही कविता लक्षवेधी ठरली.

पैठणचे संदीप शिवाजीराव जगदाळे यांच्या -

**मी गोदावरीच्या काठचं एक गाव**
**सोडून**
**येऊन बसलोय तिच्याच काठावरच्या**
**या गावात,**
**वर्षानुवर्ष चाललोय इथल्या प्राचीन**
**रस्त्यांवर**
**पण ही परकी माती माझ्या**
**तळपायांना बिलगत नाही.**

या कवितेतून विस्थापितांचं लंबकासारखं कुठेच स्थिर नसणारं भवताल आणि भावविश्व दिसून आले.

नागपूरचे मेघराज मेश्राम यांची जीवनाला व जगण्याला केंद्रस्थानी ठेवून रचलेली तळमळ उराशी बाळगणारी -

**दारापुढं बसून**
**पोरीच्या डोक्यातील उवा टचकन**
**मारतेस...**
**मध्येच खुद्कन हसतेस**
**बाई ग तू तुझ्या दु:खांना असंच नख**
**लावतेस?**

ही कविता अंतर्मुख करणारी होती.

पुण्याच्या ग्रामीण भागातून आलेल्या तान्हाजी रामदास बोऱ्हाडे यांची -

**आईच्या पायातला काटा**
**मी कितीदा उपटून काढलाय...**
**मी फक्त काटाच काढून टाकला**
**वेदना मात्र तशीच राहिली**
**आईच्या रक्तबंबाळ पायात.**

ही कविता कवितेचे उगमस्थान, शल्य व वेदना दर्शवते.

**चांदवडच्या सागर जाधव जोपुळकर यांची**

**फॉस्फरस सोडला बुडाला**
**वेदनेचा झाला गर्भात जाळ**
**माती मागतेय पेनकिलर**
**कन्हू लागलाय हिरवा माळ**

ही कविता आधुनिक काळातील कृषिसंस्कृतीचे वास्तव चित्रित करते.

यासह इतर अनेक कवितांनी विशाखा काव्य पुरस्कार वितरण सोहळा रंगतदार झाला. कुसुमाग्रज अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी प्रास्ताविक केले व प्रत्येक कवीचा त्याच्या कवितेसह परिचय करून देत कार्यक्रमास एक वेगळी उंची प्राप्त करून दिली. डॉ. माधुरी खर्जुल व डॉ. पूनम वाघ यांनी सूत्रसंचालन केले. श्री. सचिन शिंदे यांनी आभार मानले.

---

## पालकांसाठी महत्त्वाची बातमी!

### २ जुलैपासून राज्यभरात स्कूल बस बंद



**प्रमुख मागण्या कोणत्या?**

शालेय वाहतूक सेवेसंदभार्तील सर्व शिफारसी शाळा बस सेवेवर लागू केल्याची स्पष्टता देणारे ई-चलन त्वरित रद्द करावेत. तसंच सर्व मान्यताप्राप्त शाळा बस चालकांना ओळखपत्र देण्यात यावे. शाळा बस वाहनांवरील नियमांचे पालन करणाऱ्या वाहनांवर कोणताही अन्यायकारक दंड लादू नये. शासन, शाळा प्रशासन व शाळा बस संघटनांसह संयुक्त टास्क फोर्स स्थापन करावी, अशी मागणी अध्यक्ष अनिल गर्ग यांनी केली आहे. शासनाने आमच्या मागण्यांकडे गांभीयार्ने लक्ष दिले नाही तर 2 जुलैपासून आम्ही संपूर्ण राज्यभरात शाळा बस सेवा बंद ठेवू. आमच्या संघटनेची भूमिका सेवा थांबवण्याची नसली तरी शाळा बस व्यवसायात निर्माण होणाऱ्या अडचणींमुळं आम्हाला हा निर्णय घ्यावा लागत आहे. शाळेच्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी व शालेय वाहतुकीतील अडचणी सोडवण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी संघटनेनी केली आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी :**

राज्यभरातील शाळा सुरू झाल्या आहेत. पालकांसाठी एक महत्त्वाची बातमी समोर येतेय. राज्यभरातील शालेय बस, मालवाहतूक संघटनांनी ई-चलन प्रणालीमार्फत होणाऱ्या अन्यायकारक दंडासह विविध मागण्यांसाठी सर्व संघटनांनी एकत्र येत संप पुकारण्याची घोषणा केली आहे. १ जुलैच्या रात्रीपासून सर्व मालवाहतूकदार तर बुधवार २ जुलैपासून शालेय बस वाहतूक संघटनांनी बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. याचा परिणाम स्कुलबसवर होण्याची शक्यता आहे. राज्यातील अवजड आणि प्रवासी वाहतूकदारांच्या कृती समितीने २५ जून रोजी आझाद मैदानात आंदोलन केले होते. वाहतूक पोलिस आणि परिवहन विभागाकडून चुकीच्या पद्धतीने होणाऱ्या कारवाईविरोधात आणि अवजड वाहनांवर क्लिनर ठेवण्याच्या सक्तीविरोधात हे आंदोलन केले होते. तसंच, ई चलनाच्या माध्यमातन होणाऱ्या कारवाईमध्ये सुसूत्रता नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला होता. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या मध्यस्थीनंतर हे आंदोलन थांबवण्यात आले होते. मात्र मागण्या मान्य न झाल्याने कृती समितीने १ जुलैपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. दरम्यान, राज्यात अनधिकृतरित्या शालेय बस वाहतुकीकडे दुर्लक्ष केले जाते. तर नियमामुसार वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई केली जाते. अवैध वाहतुकीस आळा घालण्याच्या मागणीकडे गांभीयार्ने लक्ष द्यावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

---

## पंढरपूरला निघालेल्या एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार, कोयत्याचा धाक दाखवत लुटले दागिने

**■पुणे। प्रतिनिधी :**

दौंड तालुक्यात धक्कादायक घटना घडली असून आषाढी वारी निमित्त दर्शनासाठी पंढरपूरला निघालेल्या चारचाकीमधील अल्पवयीन मुलीच्या गळ्याला कोयता लावून दोन तरुणांनी अत्याचार केला. त्याचबरोबर मुली सोबत असणाऱ्या महिलांच्या डोळ्यात मिरचीची पावडर टाकून दीड लाख रुपयांचे दागिने लुटल्याची घटना समोर आले आहे.

दरम्यान, पुणे- सोलापूर महामार्गहून जात असताना दौंड तालुक्यातील स्वामी चिंचोली या गावाजवळ पहाटेच्या दरम्यान ड्रायव्हर चहा पिण्यासाठी थांबलेला असताना दुचाकीवरून आलेल्या दोन तरुणांनी कोयत्याचा धाक दाखवून पंढरपूरला जाणाऱ्या एका अल्पवयीन मुलीच्या गळ्याला कोयता लावून तिच्यावर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना दौंडमध्ये घडली आहे. या प्रकारामुळे पुणे ग्रामीण पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणी दोन तरुणांविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पुन्हा एकदा महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर**

दौंडमधील या घटनेनंतर सर्वांनाच धक्का बसला आहे. या घटनेनंतर दौंड तालुक्यातील कायदा सुव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केला जात आहे. तर महिलांच्या सुरक्षेतेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पुणे-सोलापूर महामार्ग पहाटे घेडलेल्या या घटनेमुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. वारीमधील महिला सुरक्षित आहेत का? असा देखील सवाल या ठिकाणी उपस्थित केला जात आहे. या प्रकरणी सध्या दौंड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

**नेमकं काय घडलं?**

सोमवारी पहाटे साडेचारच्या सुमारास काहीजण पुणे-सोलापूर महामार्गावरून चारचाकी वाहनाने पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी जात होते. त्याचवेळी तिथे दोघेजण दुचाकीवरून आले. चहा पिण्यासाठी ते थांबले होते. त्याच वेळी त्या दोघांनी आपल्या जवळ असणाऱ्या कोयता काढत एका अल्पवयीन मुलीच्या गळ्याला लावला आणि त्या ठिकाणी टपरीच्या शेजारी असणाऱ्या नाल्याच्या शेजारी असर्णाया झाडीमध्ये फरपटत घेऊन गेले. तिच्यावर दोघांनी तिथेच अत्याचार केला.

त्यावेळी तिथे असणाऱ्या एका महिलेच्या डोळ्यांमध्ये या दोन तरुणांनी लाल रंगाची चटणी टाकून तिच्या अंगावर असणारे १ लाख ५० हजार रुपयांचे दागिने घेऊन दोघेही प्रसार झाले. ही संपूर्ण घटना दौंड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून सध्या या प्रकरणी दोन अज्ञात व्यक्तींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दौंड पोलीस सध्या या आरोपींचा शोध घेत आहेत अशी माहिती अप्पर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार यांनी दिली आहे.



## महाराष्ट्राला हादरवणाऱ्या दोन घटना

### जन्मदात्या बापांनीच मुलींची केली हत्या, एकीने चॉकलेट मागितले म्हणून तर, एकीला....

**■लातूर/ धाराशिव । प्रतिनिधी :**

लेक म्हणजे बापाचं काळीज असतं. पण महाराष्ट्रात घडलेल्या दोन घटनांमुळं बाप आणि लेकीच्या नात्याला काळिमा फासला आहे. एका घटनेत दारूच्या नशेत बापाने पोरीचा जीव घेतला. तर दुसऱ्या एका घटनेत मुलीने चॉकलेटसाठी हट्ट धरला म्हणून बापाने तिचा निर्घृणपणे खून केला आहे. या दोन्ही घटनांनी महाराष्ट्र हादरला आहे. मराठवाड्यातील लातूर आणि धाराशिव येथे या घटना घडल्या आहेत.

दारू संसार उध्वस्त करते हे आपण अनेकवेळा पाहिलं आहे, ऐकले आहे. मात्र याचीच एक दुर्दैवी प्रचिती मराठवाड्यात आली आहे. एक ४ वर्षीय मुलीने चॉकलेट मागितले म्हणून बापाने मुलीला गळफास देऊन मारलं तर दुसऱ्या एक घटनेत धाराशिवमध्ये बापाने १० वर्षीय मुलीचा कुऱ्हाडीने मारून खून केलाय या दोन्ही घटना घडल्या आहेत ते दारूच्या नशेत. या घटनांनी परिसरात एकच खळबळ माजली आहे.



लातूरच्या उदगीरमध्ये चार वर्षांच्या निरागस मुलीने वडिलांकडे चॉकलेटसाठी हट्ट धरला होता. लेकीच्या या हट्टाला वैतागून नराधम पित्याने साडीने चिमुकलीचा गळा आवळून खून केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. लातूर जिल्ह्यातील भीमा तांडा येथील हा प्रकार संतापजनक आहे. उदगीर तालुक्यातील भीमा तांडा येथील बालाजी बाबु राठोड या ३६ वर्षीय व्यक्तीला चार वर्षाची मुलगी आहे. बालाजी राठोड हा दारूच्या आहारी गेला आहे. दुपारी चार वर्षाच्या त्याच्या मुलीने चॉकलेटसाठी हट्ट धरला. रागाच्या भरात असलेल्या बालाजी राठोड याने साडीने स्वतःच्या चार वर्षाच्या मुलीचा गळा आवळून खून केला आहे. आरुषी बालाजी राठोड ही चार वर्षाची चिमुकली गतप्राण होईपर्यंत आरोपीने साडीचा फास काही सोडला नव्हता. आरुषीची आई वर्षा घरी आल्यानंतर तिला प्रकार लक्षात आला आणि तिने पोलिसात धाव घेतली. तपासाअंती हा गुन्हा बालाजीनेच केल्याचे उघड झालं.

तर धाराशिवच्या दुसऱ्या एक घटनेत बापाने १० वर्षीय मुलीचा खून केलाय. डोक्यात धारदार शस्त्राने वार करून पोटच्या गोळ्याला संपवलं आहे. गौरी ज्ञानेश्वर जाधव वय वर्ष १०वर्ष असं खून केलेल्या मुलीचा नाव आहे. वडिलांना दारूचे व्यसन असल्याने गौरी तिच्या आजी बरोबर राहत होती. मात्र बापाने इथं येऊन मुलीचा खून केला. मुलगी वारंवार आजारी पडतेय म्हणून हा खून केल्याचं बापाने कबूल केलंय. गौरी जाधव ही गावातील शाळेत चौथीत शिक्षण घेत होती. हत्या केल्यानंतर आरोपी बापाने पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. पण आजीच्या सतर्कतेमुळे सत्य बाहेर आलं. आंबी पोलिसांनी आरोपी ज्ञानेश्वर जाधव याला ताब्यात घेतलं आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# भाषिक अस्मितेचा संघटित विजय

महाराष्ट्र विधिमंडळाचे आजपासून सुरू होणारे पावसाळी अधिवेशन हिंदी भाषेच्या मुद्यावरून सत्ताधारी महायुती सरकारला भलतचे जड जाणार असे दिसत होते. राज्यातील एकूणच परिस्थिती पाहता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वेळीच नमते घेऊन हिंदी भाषा पहिलीपासून लागू करण्याचे दोन शासनादेश (जीआर) रद्द केले. हिंदी भाषेला विरोध केवळ ठाकरे बंधू यांच्याकडूनच होत होता असे नाही तर राज्यातील अनेक मराठी भाषातज्ञ, साहित्यिक, काही कलाकार, प्रचंड संख्येने मराठी भाषिक लोक याविरोधात एकवटले होते. इतकेच नव्हे तर सत्तेत सहभागी असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही पहिलीपासून हिंदी भाषा लागू करण्याच्या सरकारच्या निर्णयाला उघड विरोध केला होता. हिंदी भाषा ही पाचवीपासून शिकवली जात आहे ते योग्य आहे, असे त्यांना स्पष्ट केले होते. राज्यातील विविध राजकीय पक्ष हिंदी लागू करण्याच्या विरोधात एकवटले होते. राज्यातील वातावरण महायुती सरकारविरोधात तापत चालले होते. यात सगळ्यात मोठी गोची तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची झाली होती. कारण ते खरी शिवसेना आपली असा दावा करत होते, पण त्यांना हिंदीच्या विषयावर गप्प बसावे लागले होते. अशी सगळ्या बाजूने झालेली कोंडी लक्षात घेऊन मुख्यमंत्री फडणवीस यांनी हिंदीविषयीचे दोन जीआर रद्द केले, पण गिरे तो भी टांग उपर अशी भूमिका घेत आम्ही नरेंद्र जाधव समिती स्थापना करणार आहोत, ती समिती जो निर्णय देईल, त्यानुसार आम्ही त्रिभाषा सूत्राचा अवलंब करू, असे फडणवीस यांनी म्हटले आहे. राज्य सरकारने घेतलेली ही माघार हा राज्यातील मराठी माणसांच्या भाषिक अस्मितेचा संघटित विजय आहे, असेच म्हणावे लागेल. हिंदी भाषेच्या सक्तीचा निर्णय तूर्तास निकाली निघालेला आहे. त्यामुळे ५ जुलै रोजी होणारा सर्वपक्षीय मोर्चा रद्द करण्यात आलेला आहे. त्यामुळे आता अधिवेशनात शेती, वीज, पाणी, आरोग्य, महागाई, पायाभूत सुविधांवरील ताण, बेरोजगारी, गर्दी, लोकल प्रवाशांचे प्रश्न यावर विचार व्हायला हवा. आत्महत्या किंवा हुंडाविरोधी कठोर कायद्याची गरज आहे. कोयना किंवा शहापूर आदी अनेक प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या जमिनी विकास प्रकल्पात ताब्यात घेऊन कित्येक वर्षे उलटली तरी अद्याप पुरेसा मोबदला मिळालेला नाही, त्यांची न्यायाची मागणी सुरूच आहे. महाराष्ट्रात नुकत्याच पूर्ण झालेल्या आणि येऊ घातलेल्या अनेक प्रकल्पांची भर पडली आहे. यापैकीच शक्तीपीठ महामागार्साठी केल्या जार्णाया भूसंपादनला विरोध होत आहे. या प्रकल्पाचा विषय यंदाच्या पावसाळी अधिवेशनात चर्चिला जाण्याची दाट शक्यता आहे. या प्रकल्पाला कोल्हापूर, धाराशिव, बीड या भागातील शेतर्कयांचा विरोध आहे. प्रकल्प मार्गी लागण्यासाठी या मुद्यावर उपाययोजनेची आवश्यकता आहे. तर शेतकरी कर्जमाफी आणि पीकप्रश्न, एप्रिल-मे महिन्यातील अवकाळी पावसाने शेतर्कयांचे झालेले नुकसान, कर्जमाफीचा प्रश्न दरवर्षीप्रमाणे यंदाच्या अधिवेशनातही मांडला जाईल. याला जोडूनच शेतीतील पावसाळी पूर्वतयारी, बियाणे, खतांचे वाटप हे विषयही समोर येणार आहेत. कृषी हमीभाव, कृषी उत्पन्नाची उचल आणि धान्य साठवणुकीचा विषयही आतापासूनच सुरू झाला आहे. त्यासाठी पीक विमा, पूर नियंत्रण आणि अतिवृष्टीमुळे होर्णाया नुकसानाविषयी सरकारची काय तयारी आहे, असा प्रश्न अधिवेशनात उपस्थित होईल. सरकारकडून भूसंपादनासंदर्भातील तुकडेबंदी सुधारणा कायद्याची मागणी यंदाच्या अधिवेशनात शेतकरी संघटनांकडून होण्यासारखी परिस्थिती आहे. अल्पभूधारक शेतकरी त्यासाठी पुढाकार घेतील, यात 'गुंठेवारी' कायद्यातील सुधारणेची मागणी होईल. याशिवाय केंद्राच्या 'जीएसटी' करप्रणालीला राज्यांचा कायम असलेला विरोध याही अधिवेशनातून पुढे येईल. सार्वजनिक क्षेत्रातील बँका, संस्थांकडून राष्ट्रीय बँकाच्या तुलनेत राज्य आणि केंद्राच्या आर्थिक धोरणावर सापत्न वागणुकीचा आरोप यंदाच्या अधिवेशनात होण्याची शक्यता आहे. शहरी भागातील वाहतूक कोंडी, रखडलेल्या योजना, केंद्रीय विकास योजनांचा पालिकांवर पडणारा ताण, शहरी भागात नागरी सुविधा, शिक्षण, आरोग्य, ग्रामीण भागात बोगस बियाणे, वीज, दूध दर आदी विषयही चचेर्ला येतील. लोकल ट्रेनमधील अपघात, क्लस्टर, रेल्वेच्या रखडलेल्या विकास योजना, भूसंपादनाचा प्रश्न, प्रवाशांची गर्दी, रेल्वे तत्सम आणि पालिकांमधील समन्वय आदी मुद्देही यंदाच्या अधिवेशनात समोर येतील. वाढती गुन्हेगारी, अंमली पदार्थ तस्करी, महिला सुरक्षेचा प्रश्नही कायम आहे. यंदाच्या अधिवेशनातही राज्यकर्त्यांवर घोटाळे आणि गुन्हेगारी आणि यंत्रणांवर दबाव टाकून सत्तेचा गैरवापर केल्याचे आरोप होतीलच. राज्यातील महापालिकांच्या निवडणुका लवकरच होणार असल्याने यंदाच्या पावसाळी अधिवेशनावर नागरी प्रश्नांवरून सत्तार्धायांना कोंडीत पकडण्याचे प्रयत्न होणार हे स्पष्ट आहे. या अधिवेशनातून धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी करणे अपेक्षित आहे. कुठलेही राजकारण न करता नागरिकांच्या समस्या सोडवून त्यांना दिलासा देण्याचे काम व्हायला हवे. विधिमंडळाच्या या पावसाळी अधिवेशनाच्या तोंडावर हिंदीच्या मुद्यावरून राज्यात जनक्षोभ उसळला होता. विरोधकही एकवटले होते. त्यामुळे अधिवेशनाचे कामकाज या हिंदीविरोधात वाहून जाईल, असे सत्तार्धायांना वाटत होते. तसेच या विरोधाचा फटका लवकरच होर्णाया स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये बसेल हे सरकारला दिसत होते. त्यामुळे त्यांनी वेळीच माघार घेतली आहे.

# शक्तिपीठ महामार्ग नव्हे, लुटीचा राजमार्ग




शक्तिपीठ महामार्गासाठी सरकारने ८६ हजार कोटींचा खर्च करून ४,००० हेक्टर सुपीक जमीन अधिग्रहित करण्याचा निर्णय घेतला आहे. गरजूंसाठी निधी नाही, पण उद्योगपतींसाठी प्रकल्प रेटले जात आहेत. हा महामार्ग पर्यावरण, शेतकरी, जलस्रोत यांच्यावर घातक परिणाम करणार असून, विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांना भूमिहीन करण्याचा डाव आहे. सरकारचा हा अट्टाहास जनहिताचा नसून उद्योगपतींच्या फायद्यासाठी आहे, असा आरोप करण्यात येत आहे.

लेकरू रडल्याशिवाय आईसुद्धा त्याला दूध पाजत नाही. त्याच पद्धतीने 'लोकं मागून-मागून थकली तरी सरकार काही देत नाही' हे वास्तव आहे. शेतकरी कर्जमाफीची मागणी करून रोज फासावर लटकत आहेत. लाडक्या बहिणी २,१०० रुपये कधी मिळणार आहेत, असा आर्त सवाल करत आहेत. पण सरकार त्यांच्या मागण्या काही पूर्ण करत नाही. पण कोणाचीही मागणी नसताना सरकार ८६ हजार कोटी रुपये खर्चून ८०२ किलोमीटरचा महामार्ग बांधायला निघाले आहे. या महामार्गाला 'शक्तिपीठ' असे नाव देऊन लोकांच्या धार्मिक भावनांना हात घालून सरकार या महामार्गाचा जोरदार प्रचार करत आहे. मुख्यमंत्र्यांनी सर्व यंत्रणा युद्धपातळीवर कामाला लावली आहे. अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई द्यायला निधी द्यायच्या अगोदर सरकारने कर्ज काढून या महामागार्साठी निधी उभा केला आहे. यावरून या महामार्गाच्या उभारणीसाठी किती मोठी शक्ती कार्यरत असेल याचा अंदाज येतो. यासाठी सुरू असलेला अट्टाहास पाहता हे जनहिताचे काम नाही हे नक्की आहे. हा महामार्ग महाराष्ट्राच्या लुटीचा राजमार्ग असून, त्यामागे सरकारचा हेतू दुष्ट आहे हे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट दिसत आहे.

### कर्ज काढून उधळपट्टी

हा महामार्ग नागपूरपासून गोव्याच्या सीमेवरील पात्रादेवीपर्यंत जाणार असून, यात कोल्हापूरची महालक्ष्मी, तुळजापूरची तुळजाभवानी आणि पात्रादेवी ही शक्तिपीठे; औंढा नागनाथ, वैजनाथ ही ज्योतिर्लिंगे; पंढरपूर, अंबेजोगाईसारखी तीर्थक्षेत्रे जोडली जाणार आहेत. या प्रकल्पावर प्रतिकिलोमीटर १०७ कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून, एकूण ८६ हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे, जो इतर प्रकल्पाप्रमाणे वाढून सव्वा ते दीड लाख कोटींपर्यंत जाईल. हा प्रकल्प केंद्र सरकारच्या योजनेतून न घेता राज्य सरकार कर्ज काढून पूर्ण करणार आहे. यासाठी हुडकोकडून ८.८५ टक्के व्याजदराने १२,००० कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात आले आहे. बाजारात सहा टक्के व्याजदराने अनेक वित्तीय संस्था कर्ज उपलब्ध करून देत असताना इतक्या वाढीव दराने कर्ज घेणे हे गौडबंगाल असून एफआरबीएमचे उल्लंघन आहे.

### प्राधान्यक्रमाचा विसर

निधीअभावी राज्यातील अनेक प्रकल्प थांबले आहेत. शेतकरी कर्जमाफी नाही. लाडक्या बहिणींना २,१०० रुपये मिळत नाहीत. शाळांमध्ये शिक्षक नाहीत, रुग्णालयांमध्ये डॉक्टर आणि कर्मचारी नाहीत, राज्य सरकारची तीन लाखांहून अधिक पदे रिक्त आहेत, ती भरली जात नाहीत. सरकारी कंत्राटदारांची एक लाख कोटींहून अधिकची थकित बिले दिली नाहीत. शेकडो सिंचन प्रकल्पाची मान्यता रद्द केली आहे. यातील बहुतांश प्रकल्प हे विदर्भ मराठवाड्याच्या दुष्काळी भागातील आहेत. आदिवासी, अनुसूचित जाती-जमातींच्या योजनांच्या निधीत कपात केली जात आहे.

### शेतकऱ्यांना भूमिहीन करण्याचा डाव

सिंधुदुर्ग, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, लातूर, बीड, धाराशिव, हिंगोली, यवतमाळ, अकोला, वर्धा अशा बारा जिल्ह्यांतील ४,००० हेक्टर सुपीक जमीन या प्रकल्पासाठी अधिग्रहित केली जाणार असून, हजारो शेतकरी भूमिहीन होणार आहेत. आचार्य विनोबा भावे यांनी देशभर फिरत गरीब, भूमिहीन शेतकऱ्यांसाठी जमिनी मागून भूदान चळवळ उभी केली होती. आज नेमके याच्या उलट घडत आहे. शक्तिपीठ महामार्ग, समृद्धी महामार्ग, औद्योगिक कॉरिडॉर यांच्या नावाखाली शेतकऱ्यांकडून सुपीक जमिनी हिरावून घेतल्या जात आहेत. ही विकासाची नवी संकल्पना जनतेऐवजी उद्योगपतींच्या फायद्याची असून, शेतकऱ्यांना भूमिहीन करणारी आहे.

### खनिज संपत्तीच्या लुटीचा राजमार्ग

विदर्भ व मध्य भारत खनिज संपत्तीने समृद्ध प्रदेश आहे. या भागातील खाणीतून निघणारे लोह, कोळसा, मँग्नीज, बॉक्साईट परदेशात पाठवण्यासाठी गोव्याच्या बंदरापर्यंत त्याची वाहतूक करण्यासाठी हा महामार्ग बांधला जात आहे. सरकारच्या काही लाडक्या उद्योगपतींची यातून मोठी सोय होणार आहे. त्यांच्या दबावामुळेच जनविरोध पायदळी तुडवून सरकार हा प्रकल्प रेटत आहे. हा सर्व खटाटोप गडचिरोलीच्या जंगल व पर्यावरणाला मारून सुरू असलेल्या सुरजागडच्या प्रकल्पातून निघणाऱ्या लोह खनिजासाठी सुरू आहे, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.

### पर्यावरणीय संकट

पश्चिम महाराष्ट्रातील बागायती भागातून हा महामार्ग जात असल्यामुळे नद्यांचे प्रवाह, भूजल पातळी आणि जैवविविधतेवर त्याचे अत्यंत प्रतिकूल परिणाम होणार आहेत. कृष्णा, भीमा, कोयना या नद्यांच्या काठावरच्या सुपीक पट्ट्यातील शेतजमिनी नष्ट होण्याची भीती आहे. वृक्षसंपदा, वनजमीन महामार्गात गेल्याने पर्यावरण, जैवविविधतेवर दुष्परिणाम होऊन जलस्त्रोत, भूजल पातळीला धोका निर्माण होणार आहे. नद्या, विहिरी, पाईपलाइनचं नुकसान होणार आहे. तसेच रस्त्याच्या उंचीमुळे पाण्याचे प्रवाह बदलणार असून, पूरस्थितीचा मोठा धोका निर्माण होणार आहे.

### राज्यात शक्तिपीठ महामार्ग एवढे एकच काम बाकी आहे!

शक्तिपीठ महामार्ग नको असेल तर तो रद्द करण्याची मी घोषणा करतो, 'एक बार मैने कमिटमेंट दिया तो, मैं खुद का भी नहीं सुनता हूं' असा शब्द तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी दिला होता. पण निवडून येताच त्यांनी आपला शब्द फिरवला. राज्यात सर्व काही आलबेल आहे. विकासाची गंगा गाव-खेड्यापर्यंत पोहचली आहे. राज्य सुखी आहे. शेतकरी आत्महत्या करत नाहीत. त्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चाच्या दीडपट भाव मिळतोय. राज्यात कोणीही बेरोजगार नाही, महागाई नाही. गाव-खेडे, आदिवासी पाड्यापर्यंत चकाचक हायवे झाले आहेत. राज्यातील १४ कोटी जनता सर्व सुखी आहे, त्यांना आता शक्तिपीठ महामार्गाशिवाय कशाहीचीही आवश्यकता नाही, असे शासनास वाटत आहे. त्यामुळे त्यांनी हा नको असलेला महामार्ग बांधायला घेतला आहे का? असा प्रश्न राज्यातील जनतेला पडलेला आहे.

### सुपीक जमिनीवर क्राँकीट ओतून दुष्काळ हटवणारे सरकार

मुख्यमंत्री म्हणतात की, शक्तिपीठ महामार्गामुळे मराठवाड्याचा दुष्काळ दूर होईल. त्यामुळे राज्यातल्या सर्वसामान्य जनतेला काही प्रश्न पडले आहेत की, हा महामार्ग काय पाण्याची पाईपलाइन आहे का? की या रस्त्यात पाणी साठवून शेतकऱ्यांना दिले जाणार आहे? की रस्त्याच्या खाली साठवण तलाव बांधणार आहेत? की या रस्त्यावरून टँकरने पाणी येणार आहे? पण सरकारचे म्हणणे आहे की, आम्ही या रस्त्यासाठी तुमची शेतीच काढून घेत आहोत, मग दुष्काळ राहणार नाही. मराठवाड्याला खरोखर दुष्काळमुक्त करण्याची सरकारची इच्छा असेल, तर सरकारने हा महामार्ग गुंडाळून शेततळ्यांचा विस्तार करावा, अपूर्ण प्रकल्पांना निधी द्यावा, जलसिंचन योजना पूर्ण कराव्यात शेतकऱ्यांना वेळेवर वीज, बियाणे, खत उपलब्ध करून द्यावीत आणि शेतीमालाला योग्य भाव द्यावा.

### चोरांची समृद्धी, शेतकऱ्यांचे मरण

सरकार पाहिजे तेवढे रस्ते बांधू शकते, विकास करू शकते. पण सुपीक जमीन तयार करू शकत नाही. अनेक पिढ्यांना पोसणाऱ्या, समृद्ध करणाऱ्या या बागायती शेतजमिनीवर ओतले जाणारे काँक्रीट या देशाचा आणि राज्याचा कणा असणाऱ्या शेतकऱ्यांच्या आयुष्यावर नांगर फिरवण्यासारखेच आहे. उद्योगपतींच्या फायद्यासाठी शेतकऱ्यांना मारून काळ्या आईच्या छाताडावर क्राँकीट भरण्याचे पातक सरकारने करू नये, हीच या महामार्गामुळे भूमिहीन होणाऱ्या गोरगरीब शेतकऱ्यांची आर्त हाक आहे.

# सासू-सासऱ्यांचे सूनेपासून रक्षण करणारा निकाल

**घटस्फोटाच्या खटल्यात नवऱ्याकडून पोटगी नक्कीच मागता येते, पण त्यामध्ये सासू-सासऱ्यांना ओढून त्यांच्या स्वकष्टार्जित घरावर ताबा ठेवून सूनेला आपली पोळी भाजून घेता येत नाही, हे मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेल्या एका निकालातून दिसून आले. हा निकाल काही ऐतिहासिक नक्कीच नाही. पण या स्वरुपाचे निकाल हे ज्येष्ठ नागरिकांना विशेष कायद्याने दिलेल्या अधिकारांच्या रक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात. याच निकालाची सखोल चर्चा...**


संपत्ती हा कोणालाही भूलवणारा मुद्दा आहे. त्यातही फारसे काही न करता संपत्ती मिळत असेल, तर ती अनेकांना हवीच असते. अशी संपत्ती मिळवताना लोक त्यात आपले कष्ट किती, आर्थिक योगदान किती याचा फारसा विचार करत नाहीत. संपत्ती लाटण्याचा प्रकारही घडत असतोच. हे सगळे थांबविण्यासाठी देशातील कायदे, न्यायालयांनी दिलेले निकाल यांची भूमिका मोलाची असते.

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने याच महिन्यात एक निकाल दिला. न्या. प्रफुल्ल खुबाळकर यांच्या एक सदस्यीय खंडपीठाने हा निकाल दिला. हा खटला आहे चांदीराम हेमनानी विरुद्ध सिनिअर सिटिजन्स पेलेट ट्रायब्यूनल व इतर. स्थावर संपत्तीचा नियम असा की त्याला कोणी ना कोणी मालक असतोच. जेव्हा एखाद्या स्थावर संपत्तीला कोणीच मालक उरत नाही, तेव्हा ती सरकार दरबारी जमा होते. म्हणजेच काय तर सरकार त्या संपत्तीचा मालक होते. स्थावर संपत्तीला कोणीच मालक नाही, असे कधीच होत नाही.

जेव्हा आपण मालक असण्याचा विचार करतो, त्यावेळी त्यामध्ये काही अधिकार हे गृहीत धरलेले असतात. मग त्यामध्ये मालकीच्या संपत्तीचा उपभोग घेणे, ती संपत्ती दुसऱ्यांना वापरण्यासाठी देणे, ती संपत्ती विकून टाकणे, संपत्तीतून मिळणारे फायदे उपभोगणे असे सगळे अधिकार येतात. त्यातही जर ही संपत्ती स्वकष्टार्जित असेल, म्हणजे काय तर स्वतःच्या पैशातून विकत घेतली असेल, तर हे अधिकार पूर्ण क्षमतेने वापरता येतात. जर संपत्ती वडिलोपार्जित असेल, तर त्याबाबत वेगळ्या पद्धतीने विचार केला जातो.

वर जो खटला दिला आहे, त्यामध्ये अशाच स्वकष्टार्जित संपत्तीचा वाद न्यायालयापुढे निकालासाठी आला होता. यामध्ये जे प्रतिवादी आहेत, त्यामध्ये याचिकाकर्त्यांचा मुलगा आणि सून यांचाही समावेश आहे. झाले असे होते की याचिकाकर्त्यांच्या मुलाच्या प्रेमविवाहानंतर त्यांनी आपले स्वकष्टार्जित घर निवासासाठी मुलाला आणि सूनेला वापरायला दिले होते. पुढे काही दिवसांनी मुलगा आणि सून यांच्यात पटेनासे झाले.

मग सूनेने नवऱ्यासह आपल्या सासू-सार्सयांविरोधातच वेगवेगळ्या तक्रारी दाखल करायला सुरुवात केली. नवऱ्याविरुद्धही तिने कौटुंबिक न्यायालयात घटस्फोटाचा खटला दाखल केला होताच. एकीकडे सून आपल्या सासू-सासऱ्यांच्या स्वकष्टार्जित घरामध्ये राहात होती आणि दुसरीकडे त्यांच्या विरोधात खोट्या तक्रारी करीत होती. संबंधित घराचा एक भाग सूनेच्या ताब्यात होता. म्हणजे सून त्या घरातच राहात होती.




वास्तविक मुलगा आणि सून यांच्या वैवाहिक नात्यामध्ये संबंधित घर ओढण्याचे कारण नव्हते. कारण मुलगा किंवा सून हे दोघेही त्या घराचे मालक नव्हते. ते केवळ घरात राहात होते. पण लेखाच्या सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे संपत्ती ही प्रत्येकालाच हवी असते. त्यातूनच हे प्रकरण जिल्हा आणि विभागीय प्राधिकरणातून पुढे पोहोचले मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठापर्यंत.

खटल्यातील याचिकाकर्ते असलेल्या ज्येष्ठ नागरिक पती-पत्नी यांनी राज्यघटनेतील अनुच्छेद २२७ मध्ये मिळालेल्या अधिकारांचा वापर करून ही याचिका उच्च न्यायालयात दाखल केली. पालक आणि ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी कायदा, २००५ मध्ये देशातील ज्येष्ठ नागरिकांना काही अधिकार बहाल करण्यात आले आहेत. या कायद्याचा आधार याचिकाकर्त्यांनी घेतला.

जेव्हा सासू-सासऱ्यांनी ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी कायदा, २००५ मधील तरतुदींच्या आधारे स्थापन केलेल्या जिल्ह्यातील उपविभागीय अधिर्कायांकडे या प्रकरणी सूनेविरोधात पहिल्यांदा तक्रार केली. त्यावेळी दोन्ही पक्षकारांना ऐकून घेतल्यावर संबंधित अधिर्कायांनी सासू-सासऱ्यांच्या बाजूने निकाल दिला आणि सूनेला ३० दिवसांच्या आत घर रिकामे करण्याचे आदेश बजावले. सूनेने लगेचच या निकालाविरोधात ज्येष्ठ नागरिक अपिलीय प्राधिकरणाकडे दाद मागितली. ही दाद मागताना सूनेने हिंदू विवाह कायद्यातील कलम १३ नुसार घटस्फोटाचा दावा न्यायालयात प्रलंबित आहे.

तसेच घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ नुसार नवरा आणि सासू-सासरे यांच्याविरुद्धही खटला प्रलंबित असल्याचा उल्लेख केला होता. दोन्ही पक्षकारांना ऐकून घेतल्यावर अपिलीय प्राधिकरणाने उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिलेला निकाल रद्दबातल ठरविला. ज्यामुळे सूनेला स्वतःच्या मालकीच्या घरातून बाहेर काढणे सासू-सार्सयांना अवघड होऊन बसले. त्यांनी मग थेट उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला.

उच्च न्यायालयाने या खटल्याचा निकाल सासू-सासरे यांच्या बाजूनेच दिला आणि सूनेला ३० दिवसांच्या आत संबंधित घर रिकामे करण्याचा आदेश बजावला. हे करतानाच न्यायालयाने उपविभागीय अधिकारी आणि ज्येष्ठ नागरिक अपिलीय प्राधिकरणाच्या कामकाज करण्याच्या पद्धतीबद्दल तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. पहिली गोष्ट म्हणजे ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी कायदा, २००५ मधील तरतुदींनुसार दाखल झालेल्या तक्रारींवर निर्णय घेण्यासाठी वैधानिक मंडळ म्हणून उपविभागीय अधिकारी आणि अपिलीय प्राधिकरण यांनी काम पाहायचे आहे.

हे काम पाहताना त्यांनी मुळात हा कायदा कायदे मंडळाने आणलाच का, त्याचा उद्देश काय होता, हे समजून घेतले पाहिजे. त्यानंतर संबंधित कायद्याच्या आधारे देशातील उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाने याआधी काय निकाल दिले आहेत, त्यामध्ये काय तर्क वापरण्यात आले आहेत, याचाही विचार केला पाहिजे. संबंधित प्रकरणामध्ये त्याचा विचार नीटपणे न केल्याने उच्च न्यायालयाने उपविभागीय अधिकारी आणि अपिलीय प्राधिकरण यांची खरडपट्टीच काढली.


ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी कायदा, २००५ हा विशेष स्वरुपाचा कायदा आहे. देशातील ज्येष्ठ नागरिकांचे हक्क हिरावून घेतले जाऊ नयेत. त्यांचे कल्याण व्हावे, या विशेष उद्देशाने हा कायदा तयार करण्यात आला आहे. अपिलीय प्राधिकरणाने उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिलेला निकाल रद्द करताना असंवेदनशीलतेचे प्रदर्शन केले असल्याचे उच्च न्यायालयाने म्हटले आहे. आणखी महत्त्वाचे म्हणजे २०२० मध्ये याच उच्च न्यायालयाने याच स्वरुपाच्या एका खटल्यात काय निकाल दिला होता, याचा संदर्भ घेण्याची तसदीही अपिलीय प्राधिकरणाने दाखविली नाही, याबद्दलही उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली.

या खटल्यामध्ये प्रतिवादी असलेले सून आणि मुलगा यांना प्रतिमहिना रुपये २० हजार वापरत असलेल्या घराच्या भाड्यापोटी न्यायालयाकडे जमा करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने काढले होते. २१ डिसेंबर २०२२ मध्ये हे आदेश दिल्यानंतर सून आणि मुलाने एक रुपयाही न्यायालयात जमा केला नव्हता. एकीकडे या सगळ्या खटल्याच्या काळात सूनेने तीन बेडरुमची एक सदनिका विकतही घेतली.

तरीसुद्धा ती सासऱ्यांचे घर सोडण्यास तयार नव्हती. केवळ नवरा आणि सासू-सासरे यांच्या विरोधात खटला प्रलंबित आहे म्हणून ती सासऱ्यांच्या घराचा वापर करीत होती. याचीही दखल उच्च न्यायालयाने घेतली आणि मुलगा व सून यांना १८ फेब्रुवारी २०१९ पासून भाड्यापोटी देणे असलेल्या रकमेची संपूर्ण थकबाकी याचिकाकर्त्यांना देण्याचे आदेशही बजावले.

आधी म्हटल्याप्रमाणे स्वकष्टार्जित स्थावर संपत्तीमध्ये मालकाला मिळणारे अधिकार हे पूर्ण क्षमतेने वापरता येतात. या निकालातून हेच दिसून आले आहे. घटस्फोटाच्या खटल्यात नर्वयाकडून पोटगी मागता येतेच. पण त्यामध्ये सासू-सार्सयांना ओढून त्यांच्या स्वकष्टार्जित घरावर ताबा ठेवून आपली पोळी भाजून घेता येत नाही, हे या निकालातून दिसून येते. हा निकाल काही ऐतिहासिक नक्कीच नाही.

पण या स्वरुपाचे निकाल हे ज्येष्ठ नागरिकांना विशेष कायद्याने दिलेल्या अधिकारांच्या रक्षणासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात. शेवटी कोणत्याही कायद्याचे अंतिम उद्दिष्ट हे त्यातील तरतुदींच्या साह्याने सामान्य लोकांना शांततेच्या मार्गाने न्याय मिळवून देणे हेच असते. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिलेला हा निकाल त्यादृष्टीने नक्कीच महत्त्वाचा आहे.




# आव्हानाकडे पाठ

सन २०१७-१८च्या आधी रेल्वेचा स्वतंत्र अर्थसंकल्प सादर व्हायचा. नव्या रेल्वेगाड्या, नवे मार्ग, भाडेवाढ असे सगळे त्यात असल्याने त्याचा वेगळाच दिमाख असायचा. सन २०१७-१८मध्ये रेल्वे अर्थसंकल्प सर्वसाधारण अर्थसंकल्पातच विलीन झाला. त्यामुळे रेल्वे भाडेवाढ आदी घोषणांना त्या अर्थाने 'मुहूर्त' उरला नाही. लांब पल्ल्याच्या गाड्यांच्या भाड्यात वाढ करण्याच्या निर्णयाबाबत मंगळवारी देण्यात आलेली माहिती याच पठडीतली.

येत्या १ जुलैपासून ही वाढ लागू होईल, हे स्पष्ट आहे. या वाढीचे स्वरूप व व्याप्ती पाहता ती लागू होण्यात कुठलीही - अगदी राजकीय देखील - अडचण नसावी. वातानुकूलित गाड्यांचा प्रवास प्रत्येक किमीमागे साधारण दोन पैशांनी, तर सर्वसाधारण गाड्यांचा प्रवास प्रत्येक किमीमागे एका पैशाने महाग होईल. म्हणजेच या भाडेवाढीचा बोजा फार नसेल. केवळ नफेखोरी हे रेल्वेचे उद्दिष्ट नसले तरी भारतासारख्या अवाढव्य देशातील रेल्वे चालवायची म्हणजे खिशात चार पैसे हवेतच. सन २०२४-२५मध्ये रेल्वेचा खर्च होता २.६३ लाख कोटी रुपये, नि महसूल होता २.६५ लाख कोटी रुपये. म्हणजेच तोंडमिळवणी करून हाती येणारा पैसा तसा ठीकठाकच. हे गणित पाहता, तब्बल पाच वर्षांनी होत असलेल्या या भाडेवाढीस विरोध करण्याचे कारण दिसत नाही. त्याचवेळी, कोट्यवधी प्रवासी ज्या उपनगरी रेल्वेतून रोज प्रवास करतात त्यांच्या तिकीटदरांत वाढ करण्यात आलेली नाही.

उपनगरी रेल्वेचे सध्याचे तिकीटदर इतर वाहतूक सेवांच्या तुलनेत अतिशय कमी आहेत, यात शंकाच नाही. त्यामुळे खरे तर उपनगरी रेल्वेच्या तिकीटदरांत काही प्रमाणात वाढ करण्यात आली असती तरी चालून गेले असते. महामुंबईसारख्या प्रदेशांतील बहुतांश उपनगरी प्रवाशांचे म्हणणे असे आहे की, तिकीटदरांत थोडी वाढ केली तरी चालेल; मात्र रोजची उपनगरी सेवा सुरळीत व विनाविलंब चालवा.

स्थानके दिमाखदार नसतील तरी चालतील, गाड्या नीट चालवा. पण घोडे इथेच पेंड खाते! स्थानकांत रंगरंगोटी करणे सोपे, गाड्यांमधील स्पीकरवरून निरुपयोगी उद्घोषणा करणेही सोपेः पण गाड्या रोज वेळेवर चालवण्याचे आव्हान पेलणे कठीण. त्यामुळेच की काय न कळे, उपनगरी गाड्यांच्या भाड्यात वाढ करण्याचे पाऊल टाकण्यास रेल्वे धजावली नसावी. पण हे आव्हान रेल्वेला कधी ना कधी स्वीकारून पेलावे लागणारच आहे. कोट्यवधी प्रवाशांच्या रोजच्या जगण्याचा त्याच्याशी संबंध आहे. हे आव्हान स्वीकारले जाईल, तो सुदिन.

## पनीर-पुदिना कटलेट

**साहित्य :** २५० ग्राम ताजं पनीर, १/२ कप शिंगाड्याचे पीठ, २-३ हिरव्या मिरच्या, १/२ चमचा वाळवलेली पुदिन्याची पूड, १/२ चमचा लिंबाचा रस, बारीक चिरलेली कोथिंबीर, उपवासाचे मीठ चवीप्रमाणे.

**कृती :** पनीर कटलेट्स करण्यासाठी सर्वप्रथम पनीरला किसून घ्या. हिरव्या मिरच्यांना बारीक चिरून शिंगाड्याच्या पिठात पनीर आणि मिरच्या घाला. आता उरलेले साहित्य वाळवलेली पुदिन्याची पूड, लिंबाचा रस, मीठ, बारीक चिरलेली कोथिंबीर टाकून त्याला मिक्स करून हवे त्या आकाराचे कटलेट करा. तवा गरम करून त्यावर थोडे तूप किंवा शेंगदाण्याचे तेल टाकून दोन्हीकडून कुरकुरीत खमंग शॅलो फ्राय करून घ्या. तयार कटलेट्सला दही किंवा हिरव्या चटणीसोबत सर्व्ह करा.



# आपल्या स्वयंपाकघरातच आहेत सौंदर्यप्रसाधने



तुमच्या केसांपासून ते पायांच्या नखांपर्यंत सर्व गोष्टींची निगा राखण्यास मदत करण्यासाठी विविध तऱ्हेची सौंदर्यप्रसाधने बाजारामध्ये उपलब्ध आहेत. पण या सर्व प्रसाधनांमध्ये अगदी कमी प्रमाणात का होईना, पण रसायने असतातच. त्यामुळे क्वचितप्रसंगी या सौंदर्यप्रसाधनांमुळे ॲलर्जीदेखील उद्भवू शकते. हा धोका टाळायचा असेल, तर घरी तयार केलेली, नैसर्गिक पदार्थ असलेली प्रसाधने वापरणे कधीपण अधिक सोयीस्कर आणि फायद्याचे असते. घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडाफार वेळ खर्ची घालावा लागत असला, तरी त्यापासून आपल्या त्वचेला किंवा केसांना मिळणारे फायदे पाहता, घरी प्रसाधने तयार करण्यासाठी थोडा वेळ जरूर द्यावा.



**साखर :** थंडीमध्ये किंवा उन्हाळ्यामध्ये ओठ कोरडे पडून खरखरीत होतात. याचा उपाय आपल्या स्वयंपाकघरामध्ये अगदी सहज उपलब्ध आहे, तो म्हणजे साखर. साखरेमुळे त्वचेवरील मृत पेशी हटवल्या जाऊन, त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढते. याकरिता एक टीस्पून खोबरेल तेलामध्ये एक लहान चमचा मध मिसळावा. या मिश्रणात दोन मोठे चमचे साखर घालून, मग थोडासा लिंबाचा रस घालावा आणि हे मिश्रण व्यवस्थित एकत्र करावे. ही तयार झालेली पेस्ट ओठांवर हळुवार गोलाकार चोळावी. दहा मिनिटे ही पेस्ट ओठांवर राहू देऊन, त्यानंतर पाण्याने धुवून टाकावी. ओठ टॉवेलने हळुवार कोरडे करून व्हॅसलिन लावावे. या उपायाने ओठ नेहमी मृदू राहतील.



**ऑलिव्ह ऑईल :** नैसर्गिक मेकअप रिमूव्हर म्हणून ऑलिव्ह ऑईलचा वापर करावा. मेकअपसाठी वापरण्यात येणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांमध्ये थोड्या प्रमाणात ॲस्ट्रिंजंट असते, ज्यामुळे आपली त्वचा कोरडी पडू लागते. मेकअप उतरवण्याकरिता ऑलिव्ह ऑईल वापरल्याने मेकअप संपूर्णपणे साफ होतोच, पण त्याशिवाय त्वचेचा कोरडेपणा दूर होऊन, त्वचेला आर्द्रता मिळते.



**टोमॅटो :** त्वचेची निगा राखण्याकरिता प्रत्येक वेळी ब्युटी पार्लरकडे धाव न घेता, घरच्या घरीच उत्तम फेस मास्क तयार करावा. नितळ, सुंदर त्वचेकरिता टोमॅटो अतिशय चांगला पर्याय आहे. टोमॅटोमधील 'अ' जीवनसत्त्व त्वचेवरील डाग हलके करण्यास सहाय्यक आहे. तसेच यामध्ये मॅग्नेशियम भरपूर प्रमाणात असल्याने त्वचेचा पोत सुधारून, त्वचा चमकदार बनते. हा मास्क बनवण्याकरिता एका टोमॅटोची पेस्ट चेहऱ्यावर लावून वीस मिनिटे राहू द्यावी. त्यानंतर चेहरा थंड पाण्याने धुवावा. या उपायाने त्वचा त्वरित उजळते.

**नारळ :** नारळाच्या दुधामध्ये 'ई' जीवनसत्त्व व केसांना पोषक नैसर्गिक तेले मुबलक मात्रेमध्ये असतात. ॲवोकाडोमध्ये केसांच्या पोषणासाठी आवश्यक प्रथिने व केसाच्या मुळांना पोषक तत्त्वे असतात. नारळाचे दूध व ॲवोकाडो वापरून तयार केलेला मास्क केसांसाठी वापरला असता, केस चमकदार आणि मुलायम बनतात. हा मास्क तयार करण्यासाठी ॲवोकाडो आणि नारळाचे दूध एकत्र करून त्यांची पेस्ट तयार करावी. ही पेस्ट केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत व्यवस्थित लावून घ्यावी. अर्धा तास ही पेस्ट केसांवर राहू देऊन त्यानंतर केस धुवावेत. या हेअर मास्कमुळे केसांच्या मुळांना ताकद मिळून, केसांची वाढ चांगली होते.

**मध आणि बदामाची पूड :** हात कोरडे पडून रखरखीत होत असल्यास त्यासाठी मास्क घरच्या घरी तयार करता येतो. एक लहान चमचा मधात थोडा लिंबाचा रस घालावा. त्या मिश्रणामध्ये एक मोठा चमचा बदामाची पूड व एक लहान चमचा अक्रोडची पूड घालावी. अक्रोडची पूड नसल्यास एक चमचा सूर्यफुलाचे तेल घालावे व हे मिश्रण हाताना चोळावे. पाच मिनिटांनी हात गार पाण्याने स्वच्छ धुवून टाकावेत. या उपायाने हात मुलायम राहतील.

# शहाळे : आरोग्याचा खजिना



कोवळा नारळ सर्वांनाच आवडतो. पण तो आरोग्यदायी घटकांचा खजिना असतो हे अनेकांना माहीत नसते. मोठे सेलिब्रिटीज, चित्रपट अभिनेते आणि अभिनेत्रींनाही नारळाच्या पाण्याचे महत्त्व कळते. अर्थात ते त्यांना कळते आणि ते हॉटेलातल्या महागड्या पेयांपेक्षाही शहाळे पिणे पसंत करतात. सामान्य लोकांनी त्यांचे अनुकरण म्हणून नाही पण नारळाचे महत्त्व समजून घेऊन त्याचा समावेश आपल्या रोजच्या आहारात केला पाहिजे. कोवळा नारळ हे निसर्गाने आपल्याला दिलेले वरदान आहे. २००६ साली करण्यात आलेल्या एका पाहणीनंतर शहाळ्याची वैशिष्ट्ये जर्नल ऑफ मेडिसिनल फूड या मासिकांत प्रकाशित करण्यात आली होती. त्यात शहाळ्याने शरीरातले कोलस्टेरॉल कमी होते असे म्हटले होते.

**आपल्याला** निसर्गाने नारळातून जे काही अनमोल असे दिले आहे त्यात कोणीही कसलीही भेसळ करू शकत नाही, हे त्याचे खास वैशिष्ट्य आहे. नारळाचे पाणी नेहमीच फ्रेश असते. ते कधी शिळे होत नाही. ते थंड असते. रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास त्याचा उपयोग होतो. एकदा याबाबत एक पाहणी करण्यात आली असता असे लक्षात आले की, पाहणीत गुंतलेल्या रुग्णांपैकी ७१ टक्के रुग्णांचा रक्तदाब कसलीही औषधे न देता केवळ शहाळ्याच्या पाण्याने कमी झाला. शहाळ्यातल्या मॅग्नेशियममुळे इन्सुलीन सेन्सिटीव्हिटी वाढते आणि मधुमेहाच्या रुग्णाला दिलासा मिळतो. ब्लड शुगर लेव्हल कमी होते. नारळाच्या पाण्यातले सोडियम आणि काही जीवनसत्त्वे ही ब्लड शुगर कमी करण्यास मदत करीत असतात. हे पाणी फ्री पार्टिकल्स आणि क्रिस्टल्स तयार करण्यास प्रतिबंध करते त्यामुळे किडनी स्टोन तयार होण्याचे टळते. काही कारणाने आणि अन्नात दोष निर्माण झाल्याने पचनशक्तीवर काही विपरीत परिणाम झाला असेल तर नारळाचे पाणी दिवसातून दोन वेळा प्यावे त्यामुळे पचनशक्ती ताळ्यावर यायला मदत होते. कारण या पाण्यात तंतुमय पदार्थ मोठ्या प्रमाणावर असतात. काही वेळा जुलाब होतात आणि डीहायड्रेशन होते. अशा वेळी नारळाचे पाणी प्यावे त्यामुळे शरीरातले पाण्याचे प्रमाण वाढते आणि डीहायड्रेशनमुळे आलेला अशक्तपणा कमी होतो. या पाण्याने चेहऱ्यावर तकाकी येते. केसही चांगले होतात. जगात गाजलेल्या काही टेनिसपटूंनी आपल्या तंदुरुस्तीचे रहस्य कोकोनट वॉटर हेच असल्याचे म्हटले होते. काही मॅरेथॉनपटूंनीही शहाळ्याला श्रेय दिले होते.



मागील काही वर्षांत भारतात ग्रीन टीचे सेवन अधिक वाढले आहे. ग्रीन टी आरोग्यासाठी चांगले आहे, यात शंकाच नाही. ग्रीन टीमध्ये अनेक प्रकारचे अँटीऑक्सिडेंट्स असतात. जे शरीरातील मेटाबॉलिज्म सुधारते, कॉलेस्ट्रॉल कमी करते. ग्रीन टी जिंक, मॅग्नीज आणि व्हिटामीन ए, बी, सी ची मात्रादेखील असते. मात्र हे सर्व फायदे असले तरी ग्रीन टीच्या अतिसेवनामुळे आरोग्याला देखील नुकसान पोहोचते.

# 'ग्रीन टी'च्या अतिसेवनामुळे होऊ शकतात या समस्या



**तोंडात फोडी येणे :** ग्रीन टीमध्ये टॅनिंस तत्त्व असते. जास्त ग्रीन टी प्यायल्याले टॅनिंस त्वचा कोरडी पडणे, तोंड कोरडे पडणे, पोट दुखणे आणि तोंडात फोडी येणे यासारख्या समस्या होतात.

**ब्लड प्रेशर वाढते :** अधिक प्रमाणात ग्रीन टीचे सेवन केल्याने ब्लड प्रेशरचा देखील धोका निर्माण होतो. ग्रीन टीमध्ये कॅफिन अधिक मात्रेत असतात. याच्या अधिक सेवनाने हृदयावर दबाव पडतो व तुमचे ब्लड प्रेशर वाढते.

**अशक्तपणा होऊ शकतो :** ग्रीन टीमध्ये काही असे तत्त्व असतात, जे शरीरातील आयरनला (लोह) शोषून घेण्यापासून रोखते. त्यामुळे तुम्ही ग्रीन टीचे अधिक सेवन करत असाल तर तुम्ही ज्या पदार्थांचे सेवन करता त्यातील आयरन शरीराला मिळणार नाहीत. अशा परिस्थितीत रेड ब्लड सेल्स कमी होतात आणि अशक्तपणा येऊ शकतो.

**मानसिक तणाव आणि चिंता वाढणे :** ग्रीन टी तणाव कमी करण्यासाठी फायदेशीर आहे. मात्र अति सेवनामुळे याचा उलट परिणाम होऊन मानसिक तणाव आणि चिंतादेखील वाढते.

# गुणांचा खजिना - घृतकुमारी (ॲलोवेरा/कोरफड)

**ॲलो**वेरा आपल्या घरामध्ये किंवा ऑफिसमध्ये विनासायास लावता येण्यासारखे असते. आजकाल ॲलोवेराचे आरोग्याच्या दृष्टीने फायदे समोर यावयास लागल्याने रस, जेल अशा अनेक प्रकारे लोक ॲलोवेराचा उपयोग करताना दिसत आहेत. दात घासल्यानंतरही दातांमध्ये प्लाक किंवा किटाणू राहतातच. त्यामुळे तोंडामधून क्वचित दुर्गंधी येऊ लागते. ही दुर्गंधी येऊ नये यासाठी माऊथवॉश उपयोगात आणला जातो. ॲलोवेराच्या रसाचा वापरदेखील प्राकृतिक माऊथवॉश म्हणून करता येतो. या रसामुळे तोंडातील प्लाक आणि किटाणू दूर होऊन दातांचे आरोग्य चांगले राहते. ॲलोवेराचा वापर माऊथवॉश म्हणून केल्याने हिरड्याही बळकट होतात. कित्येकदा जेवण जास्त झाल्याने, जेवणाच्या वेळा गडबडल्याने किंवा जास्त तिखट, मसालेदार पदार्थ खाल्ल्याने छातीत जळजळ होत असल्याची भावना होते किंवा ॲसिडीटी होते. अशावेळी ॲलोवेराच्या रसाच्या सेवनाने फायदा होतो. यामुळे छातीतील जळजळ दूर होऊन ॲसिडीटीही कमी होते. तसेच दररोज सकाळी रिकाम्या पोटी ॲलोवेराचा रस कोमट पाण्यातून घेतल्यास पोट साफ होण्यास मदत होते. केस गळत असल्यास ॲलोवेराचा गर केसांना लावल्याने फायदा होतो. तसेच चेहऱ्यावर उष्णतेमुळे मुरुमे येत असल्यासही ॲलोवेराच्या गराने फायदा होतो. या गराने त्वचेचा रंग उजळण्यास व पोत सुधारण्यास मदत होते. त्याचमुळे पुष्कळशा स्कीन क्रीम्समध्ये ॲलोवेराच्या गराचा अंश मिसळलेला असतो. ॲलोवेराच्या गराच्या वापराने वयपरत्वे त्वचेवर आलेल्या सुरकुत्याही कमी होतात व त्वचा सुंदर दिसू लागते.



# जुन्या मोबाइल फोनचा स्पीड कसा वाढवायचा? जाणून घ्या सोप्या ट्रिक्स

अनेक वर्ष एकच मोबाइल फोन वापरल्यामुळे तो स्लो होऊ शकतो. असा स्मार्टफोन काही ट्रिक्सच्या मदतीने फास्ट करता येतो. यात फॅक्ट्री रीसेट, अँड्रॉइड अपडेट, फोन स्टोरेज क्लियर करणे, लाइट ॲप्सचा वापर इत्यादी ऑप्शन आहेत.



असे अनेक लोक आहेत जे एक मोबाइल कमीत कमी ३-४ वर्ष वापरतात. विशेषतः मीडिल क्लास कुटुंबात युजर एकच स्मार्टफोन अनेक वर्ष वापरतात. परंतु स्मार्टफोन जुना झाल्यावर त्याची परफॉर्मन्सदेखील स्लो होऊ लागतो. त्यामुळे रोज फोन वापरताना समस्या येऊ लागतात. ही समस्या सोडवण्यासाठी आम्ही काही ट्रिक्स सांगितल्या आहेत ज्यामुळे जुन्या फोनचा स्पीड वाढू शकतो.

फॅक्ट्री रीसेटमुळे अनेक समस्या सोडवता येतात. फॅक्ट्री रीसेट तुमच्या स्मार्टफोनला पुन्हा फास्ट, स्मूद व नव्यासारखा बनवण्याची चांगली पद्धत आहे. स्मार्टफोन रीसेट करण्यापूर्वी तुमच्या मोबाइल फोनच्या डेटा बॅकअप घेणं आवश्यक आहे. तुम्ही मोबाइलमधील सर्व ॲप्स, फोटो, व्हिडीओ तसेच अन्य फाईल्स देखील तुमच्या डाटा बॅकअपमध्ये घेऊ शकता. फोन बॅकअप स्मार्टफोनमधील मायक्रोएसडी कार्ड किंवा गुगलमध्ये स्टोर केला जाऊ शकतो, त्यामुळे फोन फॅक्ट्री रीसेट झाल्यानंतर पुन्हा रिकव्हर करता येईल.

**अँड्रॉइड अपडेट**

अँड्रॉइड स्मार्टफोन्स गुगलद्वारे बनवण्यात येणाऱ्या अँड्रॉइड ओएसवर चालतात. ही कंपनी दरवर्षी आपल्या अँड्रॉइड ऑपरेटिंग सिस्टमचं नवीन व्हर्जन घेऊन येते ज्यात अनेक नवीन अपडेट असतात. विशेष म्हणजे अँड्रॉइड ओएसचा नवीन अपडेट फक्त नवीन फीचर्स घेऊन येत नाही तर त्यात अनेक बग्स काढले जातात. वेगवेगळ्या ॲप्स, वेबसाइट्स, गेम्स, ऑनलाइन ॲक्टिव्हिटी तसेच इंटरनेट ॲक्सेसमुळे तुमच्या स्मार्टफोनमध्ये अनेक प्रकारचे बग्स देखील येतात त्यामुळे फोनच्या प्रोसेसिंगवर एक्स्ट्रा लोड येतो. हे बग्स फक्त प्रोसेसिंग स्लो करत नाहीत तर अनेक ॲप्सवर देखील प्रभाव टाकतात. अँड्रॉइड अपडेट्समध्ये डेव्हलपर हे बग्स काढून टाकण्याचे कोड टाकतात. त्यामुळे तुमचा स्मार्टफोन कायम नवीन अँड्रॉइड व्हर्जनवर अपडेट करावा.

**फोन स्टोरेज**

फोनची स्टोरेज भरल्यामुळे डिव्हाइसच्या प्रोसेसिंगवर प्रभाव पडतो आणि तो स्लो होतो. Support.google नुसार जर तुमच्या स्मार्टफोनची स्टोरेज ९० टक्क्यांपर्यंत फुल होते तेव्हा फोनमध्ये प्रॉब्लम येण्यास सुरुवात होऊ शकते. अशावेळी तुमच्या फोन स्टोरेज वर लक्ष ठेवावं आणि अनावश्यक फोटोज व व्हिडीओज डिलीट करावे. अत्यावश्यक मीडिया फाइल्सचा इतरत्र बॅकअप घेऊन मोबाइलमधून काढून टाकाव्यात.

**लाइट अँड्रॉइड ॲप्सचा वापर**

लाइट अँड्रॉइड ॲप्स जुन्या मोबाइल फोन्ससाठी उपयुक्त ठरू शकतात. हे ॲप्स फोनमध्ये कमी स्टोरेज वापरतात तसेच जास्त इंटरनेट देखील वापरत नाहीत. असे ॲप्स वापरल्यावर फोनच्या प्रोसेसर व बॅटरीवर देखील जास्त लोड येत नाही. विशेष म्हणजे लाइट अँड्रॉइड ॲप्स फुल व्हर्जनच्या फास्ट असतात. हे लाइट अँड्रॉइड ॲप्स कमी रॅम व जुन्या प्रोसेसरवर देखील स्मूद तसेच लॅगफ्री चालतात. उदा. जीमेल गो, गुगल गो, यूट्यूब गो आणि मॅप्स गो तसेच फेसबुक लाइट, मॅसेंजर लाइट, इंस्टाग्राम लाइट इत्यादी.

## 'या' समस्यांना टाळायचं असेल तर साखरेला ठेवा दूर!

**आपल्या** रोजच्या आहारात कमी अधिक प्रमाणात साखरेचं प्रमाण चांगलंच असतं. काही वेळा प्रत्यक्षरीत्या तर काही वेळा अप्रत्यक्षरीत्या साखर आपल्या शरीरात जात असते. साखर शरीरासाठी आवश्यक घटक आहे. मात्र या साखरेचं प्रमाण नियंत्रणात ठेवण्याचीही तितकीच गरज आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक हा घातक ठरू शकतो. त्याप्रमाणेच साखरेचंही आहे. शरीरात साखरेचं प्रमाण अधिक असेल तर अनेक आजारांना सामोरं जावं लागतं. त्यामुळे आहारात साखरेचं प्रमाण नियंत्रणात असण्याची गरज आहे.



- आहारात साखरेचं प्रमाण जास्त असेल तर त्याचा परिणाम थेट तुमच्या चेहऱ्यावर दिसून येतो. त्यामुळे साखरेचं प्रमाण नियंत्रणात असण्याची गरज आहे. शरीरात साखरेचं प्रमाण नियंत्रणात असेल तर त्वचेचा पोत सुधरतो. त्वचा मुलायम आणि तजेलदार होते. विशेषतः रात्रीच्या वेळी साखरयुक्त पदार्थ कमी खाल्ले तर चेहऱ्यावर सुरकुत्या येत नाहीत. तसंच चेहऱ्यावरील मुरुम, डागही क मी होतात.
- साखरेचं प्रमाण नियंत्रणात असेल तर शांत झोप लागते.
- साखर जास्त खाल्ल्याने जळजळ आणि श्वासोच्छ्वास घेण्यास त्रास होतो.
- साखर खाल्ल्यामुळे वजन झपाट्याने वाढतं. त्यामुळे डोनट्स, पेस्ट्री, केक, मिठाई असे पदार्थ शक्यतो खाणं टाळा.
- साखरेचे प्रमाण जास्त असल्यास स्मरणशक्ती कमकुवत होते.
- साखरेमुळे मधुमेह होण्याची शक्यता असते.

# ओठांचा काळसरपणा दूर करण्यासाठी उपाय...

ओठ काळसर पडण्यामागे अनेक कारणे असू शकतात. असंतुलित आहार, पिग्मेंटेशन, खूप वेळ उन्हामध्ये वावरणे, हलक्या प्रतीची प्रसाधने, विशेषतः हलक्या प्रतीची लिपस्टिक वापरणे, अशा किती तरी कारणांमुळे ओठ काळसर पडू शकतात. पण काही साध्या उपायांचा अवलंब केल्यास ओठांचा रंग पुन्हा पूर्ववत होण्यास सहाय्य मिळते.

**ग्रीन टी**

आपण दिवसभरात अनेकदा चहा किंवा कॉफी घेत असतो. पावसाळ्यात किंवा थंडीच्या मोसमात तर चहा किंवा कॉफी पिण्याचे प्रमाण अजूनच वाढते. पण चहा किंवा कॉफीच्या अतिसेवनाने देखील ओठ काळसर दिसू शकतात. त्यामुळे दिवसातून अनेकदा चहा किंवा कॉफी घेण्यापेक्षा, ग्रीन टीच्या सेवनाचे प्रमाण वाढवा. ग्रीन टीमध्ये असलेले पॉलिफेनॉल्स शरीरातील फ्री रॅडिकल्स कमी करून, उन्हामुळे किंवा चहा - कॉफीच्या अतिसेवनाने काळसर पडलेले ओठ पुन्हा पूर्ववत करण्यास मदत करतात. ग्रीन टी च्या टी-बॅग्स थोड्याशा पाण्याने ओलसर करून घेऊन, त्याने ओठांवर हलक्या हाताने मसाज केल्यासही ओठांचा काळसरपणा दूर होण्यास मदत मिळते, तसेच ओठ मऊ राहतात.

**नारळ :** आपल्या आहारात नारळाचा समावेश अवश्य करा. हे आपल्याला निरनिराळ्या प्रकारे करता येईल. नारळाचे पाणी प्या, त्याचे ताजे खोबरे भाज्यांवर किंवा गरमागरम पोहे, उपमा, खिचडीवर घालून खा किंवा कुठल्याही भाजीच्या ग्रेव्हीमध्ये नारळाचे दूध वापरा. नारळाचे तेलही स्वयंपाकामध्ये वापरता येऊ शकेल. नारळाच्या सेवनाने त्वचा नितळ राहते. नारळाचे तेल दररोज ओठांना लावल्यास ओठ गुलाबी व मऊ राहतील.



**मध :** रात्री झोपण्यापूर्वी थोड्या मधाने ओठांवर हलक्या हाताने मसाज करावा. हे मध रात्रभर ओठांवर तसेच राहू द्यावे. मधाचा वापर आपल्या आहारामध्येही नियमित करावा. मधात अँटी ऑक्सिडंट्स व मॅग्नेशियम हा क्षार भरपूर प्रमाणात असल्यामुळे ओठांना मृदुता प्राप्त होऊन, त्यांचा काळसरपणा दूर करण्यास मध उपयुक्त आहे. त्याचप्रमाणे टोमॅटोही ओठांचा काळसरपणा दूर करण्यासाठी उत्तम आहेत. यामध्ये असलेले सेलेनियम सूर्याच्या प्रखर उन्हापासून ओठांचे रक्षण करते. टोमॅटोचा वापर आपल्या आहारामध्ये तर करावाच, शिवाय उन्हामधून फिरून आल्यानंतर त्वरित टोमॅटोची पेस्ट ओठांवर लावावी. असे केल्याने, उन्हामुळे ओठांवर आलेला काळसरपणा दूर होतो.



**अक्रोड :** अक्रोडमध्ये असलेले ओमेगा ३ फॅटी ॲसिड्स त्वचेमधील कोलाजेन वाढवण्यास सहाय्य करतात. त्वचेमध्ये कोलाजेनचे प्रमाण वाढल्याने त्वचा लवचिक होते. अक्रोडची जरा जाडसर पेस्ट बनवून त्याने ओठांवर हलक्या हाताने मसाज करावा. असे केल्याने ओठांच्या त्वचेवरील मृत पेशी निघून जाऊन ओठांचा काळसर पडलेला रंग हलका होण्यास मदत होईल. तसेच दह्याच्या वापराने त्वचा नितळ होऊन त्यावरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत मिळते. त्यामुळे आपल्या आहारामध्ये दह्याचा समावेश अवश्य करावा. दह्यामध्ये थोडेसे केशर घालून त्याने ओठांचा मसाज केला असता, ओठांवरील पिग्मेंटेशनमुळे आलेला काळसरपणा दूर होण्यास मदत मिळेल.

**लिंबाचा रस :** आपल्या शरीरामधील ॲसिड्स व तीव्र अल्कलींमुळे ओठ काळसर पडू शकतात. गरम पाण्यामधून लिंबाचा रस घेतल्याने शरीरामधून ही ॲसिड्स व अल्कली बाहेर टाकण्यास मदत मिळते. लिंबू हे अत्यंत प्रभावी ब्लीच आहे. थोडीशी साखर एका लिंबाच्या लहान फोडीवर घालून त्याने ओठ चोळल्यास ओठांचा काळसरपणा दूर होतो. त्याचप्रमाणे ॲलो व्हेरा किंवा कोरफड, ओठांचा काळसरपणा दूर करण्यास उपयुक्त आहे. ॲलो व्हेराच्या रसाचा समावेश आपल्या आहारात करावा आणि त्याच्या गराने ओठांवर नियमित मसाज करावा. या उपायाने ओठांचा काळसरपणा दूर होऊन ओठ पुनश्च गुलाबी व मृदू होतील.



# पी हळद आणि हो बरी

**मराठीत** एक म्हण आहे. पी हळद अन् हो गोरी. या म्हणीचा अर्थ काही वेगळा आहे. कोणत्याही उपायाचा परिणाम पटकन होत नसतो. हळद प्यायल्यावर लगेच कोणी गोरी होत नसते असे या म्हणीतून सुचवायचे आहे, पण प्रत्यक्षात मात्र हळद ही काही बाबतीत चटकन आणि बराच गुण देणारी आहे. असे काही प्रयोगातही दिसून आले आहे. काही लोकांनी हळद मिसळलेले पाणी दररोज सकाळी प्राशन करून त्याचे फायदे नोंदवले आहेत तर काहींनी हळदीचा चहा किती गुणकारी असतो याचा अनुभव घेतला आहे. दररोज सकाळी साधारण ग्लासभर पाणी घ्यावे. ते गरम करावे आणि कोमट झाल्यावर त्यात अर्धा चमचा हळद मिसळावी. हे पाणी थंड झाल्यावर प्यावे त्याचे अनेक फायदे होतात.



हळद ही जंतुनाशक असते. त्यामुळे ती अनेक रोगांचा सामना करण्यास उपयोगी पडते. काही वेळा ती काही रेडिएशन्सचाही प्रतिकार करण्यास फायदेशीर ठरली आहे. सध्या आपण मोबाईल फोन फार वापरतो आणि त्याच्या रेडिएशन्सचा आपल्यावर काही परिणाम होण्याची शक्यता असते. आपल्याला कोणत्या ना कोणत्या स्वरूपात हळद वापरायला मिळाली तर अशा परिणामांपासून आपण दूर राहू शकतो. हळद पाण्यात मिसळून प्यावी किंवा आहारात तिचा समावेश अवश्य होईल याची दक्षता घ्यावी. आपल्या समाजात दूध आणि हळद पिण्याची पद्धत आहे. त्यामुळे बसलेला घसा मोकळा होतो. घशाला कसला संसर्ग झाला असेल तर हळद आणि दूध गुणकारी ठरते. खोकला आल्यावर तर हळद आणि दूध घेतातच. ते घेतल्यावर दुसरे कसलेही औषध घेण्याची गरज नाही असे मानतात.

काही लोक हळदीचा चहा तयार करतात. तो तयार करण्याची पद्धत आहे. कपभर पाण्यात चमचाभर हळद टाकून हे मिश्रण उकळा. नंतर त्याला खाली उतरवून त्यात थोडा मध टाका. त्याशिवाय त्यात थोडे लिंबू पिळा किंवा त्यात संत्र्याचा रस मिसळा. त्यामुळे या मिश्रणाला चांगली चव येईल. असा हा चहा प्याल्याने वजन कमी होण्यास मदत होते. संधिवाताचा त्रास कमी होतो. शिवाय यात काही मिनरल्स रोगप्रतिकारक आणि कर्करोगास प्रतिबंध करणारे आहेत. जगाच्या काही भागात हळदीचा असा चहा फार लोकप्रिय आहे. कारण त्यामुळे मधुमेहाचा उपद्रव कमी होतो. हळद हे अगदी सहजगत्या उपलब्ध होणारे औषध आहे. त्याचा वापरही आपण करीत असतो, पण त्याचे अनेक फायदे आपल्याला माहीतही नसतात.

# ठाणे पालिकेची ४१९ कोटींची करवसुली

## ३ महिन्यातला विक्रम, मागील वर्षाच्या तुलनेत १०८ कोटींची वाढ

**ठाणे** : मालमत्ता कर विभागाने कर वसुलीत आघाडी घेतल्याने ठाणे महापलिकेच्या तिजोरीत तीन महिन्यांत ४१९ रुपयांची भर पडली आहे. करदात्यांच्या विक्रमी प्रतिसादामुळे पालिकेची घसरलेली आर्थिक गाडी रुळावर येण्यास मदत मिळणार आहे.

महापालिकेच्या तिजोरीत तुर्तास १०० कोटीहून अधिकची शिल्लक सध्या महापालिकेच्या विविध विभागांनी एप्रिल ते जून या कालावधीत ४१९ कोटींची वसुली केली आहे. त्यातही यात मालमत्ता करापोटी २९१ कोटी सर्वाधिक वसुली केली आहे, तर सर्वात कमी वसुली ही समाजविकास विभाग आणि नाट्यगृहाकडून अवघ्या १ लाखांची वसुली करण्यात यश आले आहे. त्यानुसार तीन महिन्यांत २० टक्यांच्या आसपास वसुली झाल्याचे समाधानकारक चित्र दिसत आहे.

ठाणे महापालिकेने २०२४-२५ या आर्थिक वर्षात मालमत्ता कर विभागाला ८५० कोटी रुपयांच्या कर वसुलीचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आले होते. त्यापैकी वर्षाअखेर म्हणजेच मार्च महिनाअखेर ८१० कोटी रुपयांची कर वसुली करण्यात मालमत्ता कर विभागाला यश आले होते. ९५ टक्क्यांच्या आसपास मालमत्ता कराची वसुली झाली असली तरी, गेल्यावर्षीच्या तुलनेत या कर वसुलीत १०८ कोटी रुपयांनी वाढ झाल्याचा दावा पालिका प्रशासनाने केला होता. यंदाच्या



### विभागवार करवसुली

- पाणीपुरवठा विभाग ८.६३ कोटीं
- सार्वजनिक बांधकाम विभागाने ६.३० कोटी
- अग्निशमन दल ८.३० कोटी,
- स्थावर मालमत्ता विभाग ०.८९ लाख,
- घनकचरा .०९ लाख
- वृक्ष प्राधिकरण विभाग १.६४ कोटी

### शासन अनुदान

- अपेक्षित १२३३.७९ कोटी
- मिळालेले उत्पन्न - ३०८ कोटी
- स्टॅम्प ड्युटी - अपेक्षित २०० कोटी
- मिळालेले ९३.१२ कोटी

वर्षात म्हणजेच २०२४-२५ या आर्थिक वर्षात पालिकेने मालमत्ता कर विभागाला ८१९ कोटी ७१ लाख रुपयांच्या करवसुलीचे उद्दिष्ट ठरवून दिले असून हे उद्दिष्ट गाठण्यासाठी मालमत्ता कर विभागाने १ एप्रिलपासूनच पावले उचलली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून १ एप्रिल रोजीच या आर्थिक वषार्ची मालमत्ता कराची देयके पालिकेने करदात्यांपर्यंत पाठवली आहेत. त्याबद्दलचा लघुसंदेश (एसएमएस) मालमत्ता करदात्यांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावर पाठविला होता. त्यास प्रतिसाद देत ठाणेकर करदात्यांनी यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तसेच महापालिकेने मालमत्ता कराच्या सामान्य करात १० टक्के सवलत दिल्याने त्याचाही परिणाम उत्पन्नवाढीसाठी झाल्याचे दिसून आले आहे. जून महिन्यापर्यंत मालमत्ता कर विभागाने २९१ कोटींची वसुली केली आहे.

दुसरीकडे शहर विकास विभागाने देखील यंदा चांगली सुरुवात केल्याचे दिसत आहे. या विभागाला ६५० कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यानुसार आतापर्यंत ८७.३३ कोटींची वसुली झाली आहे. पाणीपुरवठा विभागाने ८.६३ कोटींची वसुली केली आहे. पाणीपुरवठा विभागाकडून आता दर तीन महिन्यांनी पाण्याची बिले अदा केली जात आहेत. त्यानुसार पुढील काळात वसुली आणखी वाढलेली असेल असा दावा पाणीपुरवठा विभागाने केला आहे. या विभागाला २६२ कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. परंतु पाणीपुरवठा विभाग हा काहीसा पिछाडीवर गेल्याचे चित्र आहे. ठाणे महापालिकेच्या विविध विभागाकडून २०५० कोटींचे मूळ अंदाज निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार आतापर्यंत ४१९.३९ कोटींची वसुली झाली.

# आता मेट्रो स्थानकांच्या नावावरुन राजकारण तापणार

## बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघे, नाना धर्माधिकारी यांच्या नावांची मागणी

**ठाणे** : मेट्रो सेवा सुरू होण्याआधीच मेट्रो स्थानकांच्या नावावरून राजकारण सुरू झाले आहे. काही स्थानकांची नावे बदली करण्याची मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. ठाणे महापालिका हद्दीत तसेच मीरा-भाईंदर महापालिका हद्दीत मेट्रो चार, मेट्रो ९ आणि मेट्रो १० ची कामे सुरू आहेत. याठिकाणी असलेल्या काही स्थानकांची नावे बदलण्यात यावीत, अशी मागणी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. यात स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे, आनंद दिघे, नानासाहेब धर्माधिकारी, महापालिका भवन अशी काही नावे देण्यात यावीत, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच मेट्रो कारशेडची नावेही बदलण्याची मागणी त्यांनी पत्राद्वारे केली आहे. ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघात अनेक गावे व आदिवासी पाडे असून ठाणे व मीरा-भाईंदर शहराच्या जडणघडणीत व विकासात आगरी-कोळी समाजाचे फार मोठे योगदान आहे. याठिकाणी सध्या मेट्रोची कामे सुरू असून त्यांचे लवकरच लोकार्पण देखील होणार आहे. एमएमआरडीएच्या अधिका[illegible]यांनी स्थानिक नागरिकांना, भूमिपुत्रांना विश्वासात न घेता या मेट्रो स्थानकांना नावे सुचविलेली असून त्यामध्ये एखाद्या बिल्डरने विकसित केलेल्या प्रकल्पांची नावे देखील देण्यात आलेली आहेत, असे पत्रात म्हटले आहे.



### मेट्रो-१० च्या स्थानकांची नावे:

- १) भाईंदरपाडा गायमुख २) रेतीबंदरऐवजी हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे चौपाटी ३) चेना व्हिलेजऐवजी चेना गाव ४) वर्सोवा ५) काशिमीरा ६) दहिसर मेट्रो क्रमांक ९ च्या डोंगरी येथे वेलंकनी देवीचे पुरातन मंदिर आहे. त्यामुळे डोंगरी कारशेडला वेलंकनी माताचे नाव देण्यात यावे. तसेच मेट्रो क्रमांक ४ मोघरपाडा येथे पुरातन कापरादेव मंदिर असल्याने मोगरपाडा कारशेडला कापरादेव असे नाव देण्यात यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

### मेट्रो-४ च्या स्थानकांची नावे:

- १) गायमुख भाईंदरपाडा २) मोघरपाडा ओवळा ३) वाघबीळ ४) कासारवडवली ५) मानपाडा ६) तत्त्वज्ञान विद्यापीठ ७) कापूरबावडी ८) माजीवडा ९) कॅडबरी जंक्शनऐवजी ठाणे महानगरपालिका भवन १०) छत्रपती संभाजी नगर स्थानक ११) आरटीओ १२) तीन हात नाकाऐवजी धर्मवीर आनंद दिघे साहेब स्थानक

### मेट्रो-९ च्या स्थानकांची नावे :

- १) दहिसर २) पांडुरंग वाडी ३) मीरा गाव ४) काशिगाव ५) साईबाबा नगर ६) मेडतिया नगरऐवजी प.पू. नानासाहेब धर्माधिकारी स्थानक ७) शहीद भगतसिंग नगर उद्यान ८) नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान स्थानक

### वाहतूककोंडीमुळे कल्याणचे नागरिक-वाहनचालक त्रस्त

# ड्रेनेज दुरुस्तीच्या कामाला सुरुवात नाहीच



**डोंबिवली** : कल्याण नगरकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावरील पौर्णिमा चौक ते प्रेम ऑटो दरम्यानचा रस्ता एमएमआरडीए आणि पालिकेच्या ड्रेनेज दुरुस्तीच्या कामासाठी दोन दिवसांसाठी बंद करण्यात आला होता. मात्र दोन दिवस उलटूनही काम सुरू न झाल्याने नागरिकांचा, वाहनचालकांचा आणि ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांचा संयम सुटला आणि त्यांनी थेट रस्त्यावर उतरून वाहतूक पोलिसांना जाब विचारत गोंधळ घातला. कल्याण शहरातील नगर मार्गावरील अत्यंत महत्त्वाचा आणि वाहतुकीसाठी वापरला जाणारा पौर्णिमा चौक ते प्रेम ऑटो दरम्यानचा रस्ता एमएमआरडीए आणि महानगरपालिका यांनी ड्रेनेज दुरुस्तीसाठी दोन दिवसांसाठी बंद केला होता. मात्र, प्रशासनाने जाहीर केलेल्या त्या दोन दिवसांत एका दगडाचा हलवाही करण्यात आलेला नाही. आता तब्बल तीन दिवस उलटून गेले तरीही रस्त्यावर काम सुरू झालेले नसल्याने वाहतुकीचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. वाहनचालकांना दोन मिनिटांचे अंतर पार करताना अर्धा तासापेक्षा अधिक वेळ रस्त्यावर थांबावे लागत आहे. इतर मार्गांवरही प्रचंड वाहतूककोंडी निर्माण झाली आहे. यामुळे संतप्त नागरिक, वाहनचालक आणि ठाकरे गटाचे पदाधिकारी रस्त्यावर उतरले. त्यांनी थेट वाहतूक बंद करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याला जाब विचारत तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला.

# त्या रखडलेल्या कामांची डागडुजी सुरू

**विरार** : विरार पूर्वेकडील नारंगी बायपास रस्त्यावरील रखडलेल्या उड्डाणपुलाच्या कामांमुळे गेल्या अनेक महिन्यांपासून स्थानिक नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत होते. या कामांमुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर खड्डे तयार झाले होते. परिणामी वाहनचालकांना वाहतूककोंडीचा तसेच अपघातांचा सामना करावा लागत होता. अनेकदा दुचाकीस्वार आणि वृद्ध नागरिक रस्त्यावर पडल्याच्या घटना घडल्या होत्या. रस्त्याची चाळण झाल्याने विशेषतः शाळकरी विद्यार्थी, कामावर जाणारे नोकरदार आणि स्थानिक व्यापार्यांना रोजच्या प्रवासात अपार अडचणी निर्माण झाल्या होत्या. याच पार्श्वभूमीवर



आपलं महानगर या वृत्तपत्रात या रखडलेल्या कामांच्या वृत्तासह रस्त्याची दुरवस्था अधोरेखित करणारी बातमी प्रसिद्ध करण्यात आली होती. नागरिकांच्या भावना आणि संताप याला वाचा फोडत ही बातमी स्थानिक प्रशासनाच्या निदर्शनास आली. प्रशासनाने तत्काळ या बाबीची दखल घेत कारवाईचा प्रारंभ केला आहे. सध्या नारंगी बायपास रस्त्यावर डागडुजीचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. मोठ्या खड्ड्यांना रस्ता बांधकाम विभागाच्या यंत्रणांनी भरण्याचे काम सुरू केले आहे. स्थानिक नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते आणि रहिवासी यांचा या कामासाठी सक्रिय सहभाग दिसून येत आहे. कामाच्या गतीबाबत समाधान व्यक्त करत काही नागरिकांनी वृत्तपत्राचे आभार मानले आहेत.एकीकडे उड्डाणपुलाचे रखडलेले काम आणि दुसरीकडे उखडलेला रस्ता या दुहेरी संकटामुळे या परिसरातील जनजीवन त्रस्त झाले होते. मात्र डागडुजीच्या कामांना सुरुवात झाल्यामुळे वाहतुकीची गती थोडी सुधारेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती.

# पालिकेच्या रुग्णालयांना बनावट औषध पुरवठा

**विरार** : वसई-विरार महापालिकेच्या रुग्णालयांना बनावट औषध पुरवठा केल्याप्रकरणी सात ठेकेदारांविरोधात वालीव पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामुळे वसई- विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयात उपचार घेत असलेल्या रुग्णांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वसई- विरार शहर महानगर पालिकेच्या आरोग्य रुग्णालयांना ठेकेदाराच्या माध्यमातून औषध गोळ्यांचा पुरवठा केला जातो. सध्या वसई- विरार शहरात पालिकेची एकूण २१ आरोग्य केंद्र , ९ मोठी रुग्णालये , १५ आपला दवाखाना अशी रुग्णालये सुरू आहेत. या कारवाईमुळे पालिकेच्या वैद्यकीय यंत्रणेमध्ये मोठी




"वसई- विरार महापालिकेच्या आरोग्य केंद्रात जो औषध साठा येतो, त्याची तपासणी करूनच घेतली जात आहे. अशा सर्व बाबी तपासून घेतल्या जात आहेत."
**-डॉ भक्ती चौधरी , महापालिकेच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी**

खळबळ उडाली आहे.

यात ज्यांनी औषध पुरवठा केला अशा पुरवठादारांची चौकशी केली होती. यात त्यांनी ज्या भागातून औषध साठा खरेदी विक्री केला यांची माहिती मागविण्यात आली होती. मात्र त्यांची योग्य ती माहिती त्यांच्या मार्फत आली नसल्याने औषध पुरवठादार मे प्रणिक एंटरप्राइजेस आणि अन्य सहा पुरवठादार यांच्या विरुद्ध भारतीय न्याय दंड संहिता कलम ३१८(४), ३३६(३), ३४०(२),२७८, ३ (५) सह औषधी द्रव्य व सौंदर्यप्रसाधन अधिनियम १९४० चा कलम १७(ब) नुसार वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती औषध निरीक्षक सतीश चव्हाण यांनी सांगितले आहे.

या प्रकरणात महापालिकेच्या आरोग्य विभागातील अधिकार्यांची भूमिकाही संशयाच्या भोर्वयात आली आहे. वैध प्रमाणपत्र असूनही औषधे बनावट कशी निघाली, याबाबत सखोल चौकशीची गरज आहे. ''बालकांच्या जीवाशी खेळर्णाया या नराधमांना कठोरातील कठोर शिक्षा द्यावी. त्यांना काळ्या यादीत टाकून आयुष्यभरासाठी पुरवठा बंद करावा,'' असे सांगत शिवसेनेचे पालघर जिल्हा संघटक जनार्दन पाटील यांनी या अधिकार्यांचाही तपास व्हावा, अशी मागणी केली आहे.

# मेट्रो कारशेडसाठी वृक्षतोड वादाच्या भोवऱ्यात

## वृक्ष घोटाळ्याचे आरोप, स्थानिकांसह विविध संस्थांचा विरोध

**भाईंदर** : मीरारोड व भाईंदर पश्चिम भागात मेट्रो कारशेडसाठी मोकळ्या मुबलक जागा असताना डोंगरीच्या डोंगरावरील १२ हजार ४०० झाडे तोडण्याच्या निर्णयाविरुद्ध २१ हजार पेक्षा जास्त नागरिकांच्या सह्या आणि विविध संस्था, संघटना, नागरिकांच्या तक्रारींची निवेदने महापालिका, शासन आदींना दिली असतानाच मंजुरी नसलेली झाडे तोडणे व झाडांचे वय कमी दाखवून वृक्ष घोटाळा केल्याच्या तक्रारी नागरिकांनी चालवल्या आहेत. इतकेच नव्हे, तर अधिकारी व ठेकेदारावर गुन्हा दाखल करून दिलेली परवानगी रद्द करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

भाईंदरच्या सुभाषचंद्र बोस मैदान मेट्रो स्थानकजवळ मीरा इस्टेट, राधा स्वामी सत्संगसह अनेक बिल्डर आदींच्या भरपूर मोकळ्या जागा आहेत. शिवाय राई, मुर्धा-मोरवा गावाच्या मागे मोकळ्या जागा असून या बहुतांश जागा बिल्डरांनी घेतल्या आहेत. या मोकळ्या व ओसाड जागांवर कारशेड न करता थेट शहराच्या ऑक्सिजनचे मुख्य स्रोत असलेल्या डोंगरीच्या डोंगरावरील १२ हजार ४०० पेक्षा झाडे तोडून कारशेड बनवण्यास ग्रामस्थांसह शहरातील नागरिक, विविध सामाजिक संस्था, संघटना आदींचा विरोध आहे. आम्हाला ऑक्सिजन, शुद्ध व थंड हवा आणि ग्लोबल वॉर्मिंग नियंत्रणात ठेवून पाऊस देणारी तसेच प्रदूषण कमी करणारी झाडे हवीत तर झाडे तोडून



### जनआंदोलनाचा इशारा

ठेकेदाराने झाडे तोडण्यास घेतल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. रविवारी डोंगरी-तारोडीसह परिसरातील ग्रामस्थांनी निषेध फेरी काढली. यावेळी बोस मैदानपासून मेट्रो मार्गिकेच्या कामाचे दूर तर भूसंपादनपासून अनेक प्रक्रिया, परवानग्या, कांदळवन आणि सीआरझेड परवानगीदेखील आली नसताना झाडे तोडण्याची घाई कशाला? असा संतप्त सवाल नागरिकांनी केला. कारशेड दुसरीकडे न हलवल्यास जनआंदोलन मोठे उभारू, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

कारशेड नको, अशी मागणी करत २१ हजारपेक्षा जास्त नागरिकांनी सह्या केल्या आहेत.

२१ पेक्षा जास्त नागरिकांच्या सह्या आणि असंख्य निवेदनेही सोमवारी महापालिका आयुक्त यांना तसेच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, पर्यावरण मंत्री, परिवहन मंत्री आदींना देण्यात आली. उपमुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार एमएमआरडीएमध्ये अतिरिक्त आयुक्त विक्रम कुमार यांनी बैठक घेऊन नागरिकांचे म्हणणे ऐकून घेतले व पहिल्या टप्प्यातील १४०६ झाडे काढण्याच्या निर्णयास स्थगितीबाबत उपायुक्त कल्पिता पिंपळे यांना सांगितले. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी देखील परवानगी नसलेली आणि वय कमी दाखवून झाडे तोडली जाणे गंभीर असून आपण देखील इतक्या मोठ्या वृक्षतोडीच्या बाजूने नसल्याचे सांगत आयुक्तांना कार्यवाहीचे आदेश दिले.

### गुन्हा दाखल करण्याची मागणी

प्रशासन व ठेकेदार यांच्या संगनमताने पालिकेने परवानगी न दिलेली झाडे देखील मोठ्या संख्येने तोडली आहेत. प्रत्यक्ष जागेवर झाडे मोठी व जुनी अशी १५ वर्षांपेक्षा जास्त वयाची असताना देखील हा वृक्ष घोटाळा दुर्लक्षित करून बेकायदा झाडे कत्तल केल्याने नागरिकांनी गुन्हा दाखल करण्याची व झाडे तोडण्याचा निर्णय रद्द करण्याची मागणी चालवली आहे.

# येऊरमध्ये रात्रीचा धिंगाणा

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात नियमांना हरताळ

**ठाणे** : संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात येणाऱ्या येऊर परिसरात रात्री उशिरापर्यंत धिंगाणा सुरू असून, वनविभाग आणि ठाणे महापालिका प्रशासनाच्या वरदहस्ताने हॉटेल्स, धाबे आणि रिसॉर्ट्स बिनधास्तपणे सुरू असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे स्वप्नील महिंद्रकर यांनी केला आहे. दरम्यान प्रशासनाने याबाबत तत्काळ कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी मनसेच्या वतीने देण्यात आला आहे.

केंद्र सरकारच्या २०१६ च्या परिपत्रकानुसार, पर्यावरण संवेदनशील क्षेत्रात अशा प्रकारच्या व्यवसायांना स्पष्टपणे बंदी घालण्यात आली आहे. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या सीमाभागात असलेल्या येऊरमध्ये मात्र या नियमांची सर्रासपणे पायमल्ली होत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. संध्याकाळी सहा वाजल्यानंतर सामान्य नागरिकांना या परिसरात प्रवेश करण्यास मज्जाव असताना, दुसरीकडे पहाटेपर्यंत हॉटेल्स, रिसॉर्ट्समध्ये



होणाऱ्या मोठ्या प्रमाणात पार्ट्या, मद्यसेवन आणि अन्य अवैध प्रकार सर्रास सुरू असल्याचे महिंद्रकर यांनी सांगितले. या बेकायदेशीर धंद्यांवर वनविभाग किंवा महापालिकेकडून कुठलीही ठोस कारवाई होत नसल्याने संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

"येऊर परिसरात सुरू असलेल्या अवैध हॉटेल्स, धाबे आणि रिसॉर्ट्सवर वनविभाग व पालिका प्रशासनाने जर तत्काळ ठोस कारवाई केली नाही, तर मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल."
**-स्वप्नील महिंद्रकर, ठाणे शहर अध्यक्ष, जनहित व विधी विभाग**

# जळगावातील 'त्या' मुलाचा नरबळीच?

## लवकरच खुलासा होणार, चौकशीसाठी एसआयटी स्थापन

**जळगाव** : जळगावच्या एरंडोल तालुक्यातील रिंगणगाव येथे १६ जून रोजी १४ वर्षीय विद्यार्थ्यांचा गळा चिरून खून झाल्याची धक्कादायक घटना घडली होती. तेजस महाजन असे मयत मुलाचे नाव आहे. सायंकाळपासून बेपत्ता असलेल्या तेजस याचा मृतदेह हत्या करून गावाजवळ झाडा झडूपांमध्ये फेकून दिल्याचे समोर आले होते. त्याचा कंठ काढण्यात आला होता, त्यामुळे नरबळीतून हत्या झाल्याचा संशय कुटूंबीयांनी व्यक्त केल्याने या घटनेने जळगाव जिल्ह्यासह राज्यात मोठी खळबळ उडाली होती.

मयत तेजस महाजन याचे वडील यांचे गावात हार्डवेयरचे दुकान असून ते शेती करतात. वडील बाहेरगावी असल्याने तेजस महाजन हा दुकान बंद करून बाजारात फिरत असताना बेपत्ता झाला.त्यानंतर कुटूंबीयांनी पोलिसात तक्रार दिली होती. त्यानंतर दुसऱ्या दिवशी तेजस चा मृतदेह गावाजवळील झाडाझुडपांमध्ये आढळून आला होता.

गावात फिरताना मुलाचा धक्का लागल्याने याचा राग आल्याने रागातून तिघांनी मुलाला मारहाण केली होती, यात एकाने मुलावर चाकूने वार केल्याने त्याचा मृत्यू झाला होता. सुरेश खरते, हरदास वास्कले अशी अटकेतील दोघा आरोपींची नावे आहेत. तिसरा आरोपी रिचडीया कटोले हा फरार असून त्याच्या शोधार्थ पोलिसांचे पथक रवाना करण्यात आले आहे. मारहाणीत रिचडीया कटोले याने मुलाच्या गळ्यावर चाकूने वार केला, यात त्याचा मृत्यू झाला अशी कबुली अटकेतील दोन्ही आरोपींनी दिली आहे. मारहाणीत मृत्यू झाल्यानंतर आरोपींनी मुलाचा मृतदेह गावाबाहेर असलेल्या झाडा-झुडपामध्ये फेकून दिला होता असे तपासात समोर आले आहे.

घटनेनंतर पोलिसांनी तत्काळ दोन संशयितांना अटक केली होती, बाजारात फिरताना तेजस याचा धक्का लागल्याच्या काठावरून आरोपींनी त्याला मारहाण करून त्याची हत्या केला संदर्भात गुन्हा दाखल झाला होता. या प्रकरणात एक आरोपी फरार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत पोलीस अधीक्षक डॉ महेश्वर रेड्डी यांनी दिली होती.

पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात पोलिसांनी नरबळीचे कलम लावले नाही हे कलम लावण्यासाठी आणि या घटनेचा सीबीआयच्या माध्यमातून तपास करावा या मागणीसाठी रिंगणगाव येथील संपूर्ण ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. हजारोंच्या संख्येने लोक या मोर्चामध्ये ग्रामस्थ सहभागी झाले. आरोपींना फाशी द्यावी अशी मागणी यावेळी ग्रामस्थांनी केली.

आंदोलनानंतर पोलिसांनी या घटनेची गंभीर दाखल घेतली आहे तसेच या प्रकरणात तपास करण्याच्या माध्यमातून पोलिसांनी एस आय टी स्थापन केली आहे. एसआयटी पथकामध्ये सात अधिकारी, कर्मचाऱ्यांचा समावेश असून त्यांच्या माध्यमातून आता मुलाच्या हत्येच्या घटनेचा तपास केला जात आहे. त्यामुळे आता आगामी काळात या हत्येचा उलगडा होण्याची शक्यता आहे.




# खून करुन १३ वर्षांपासून फरार,आरोपीला दिल्लीतून अटक

**भाईंदर** : भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाणे हद्दीत १३ वर्षांपूर्वी एका इसमाने निर्घृणपणे खून करून तो १३ वर्षांपासून फरार होता. गुन्हे शाखा, कक्ष १ काशिमीरा यांनी या गुन्ह्याचा तपास करून फरार असलेल्या आरोपीला दिल्ली येथून अटक केली आहे. भाईंदर पूर्वेच्या साई सिना पार्क, साईबाबा नगर, नवघर रोड येथे सुरेशकुमार सूर्य नारायण चौधरी (३५) यांची २८ मे २०१२ रोजी अज्ञात आरोपीने अज्ञात कारणावरुन मयत त्यांच्या घरात इलेक्ट्रीक इस्त्रीच्या वायरने गळा आवळून तोंडावर चिकटपट्टी लावून खलबत्त्याच्या लोखंडी दांड्याने डोक्यावर, तोंडावर मारहाण करुन कटर चाकु व इतर धारदार हत्याराने तोंडावर, छातीवर, पोटावर, हातावर वार करुन तसेच गुप्तांग कापून गंभीर जखमा करुन जिवे ठार मारले होते.

याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात २८ मे २०१२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील आरोपी हा गुन्हा दाखल झाल्यापासून स्वतःची ओळख आणि अस्तित्व लपवून फरार होता. या गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने वरिष्ठांनी दिलेल्या सुचने नुसार पोलीस पथकाने गुन्हयातील आरोपीचा वेळोवेळी बिहार येथे जाऊन शोध घेतला. परंतु आरोपी मिळून येत नव्हता. या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा यांनी सुरु केला. गुन्हयातील उपलब्ध साक्षीदार आणि गोळा करण्यात आलेल्या पुराव्यानुसार आरोपी गोविंद कुमार पुत्र हरक ऊर्फ जगतनारायण चौधरी (३४), रा. अरिहंत एंटरप्राईजेस, पत्तेवाली गल्ली, नया बाजार, न्यू दिल्ली याला दिल्ली येथून गुन्हे शाखा कक्ष १ च्या पथकाने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या आरोपीचा प्राथमिक तपास केला असता त्याचा गुन्हयात सक्रीय सहभाग निष्पन्न झाला आहे. तो गुन्हा केल्यापासून दिल्ली आणि बिहार येथे स्वतःची ओळख आणि अस्तित्व लपवून वास्तव्य करत असल्याची माहिती समोर आली आहे. आरोपीला अटक करून पुढील कारवाईसाठी नवघर पोलीस ठाणे यांच्याकडे हजर करण्यात आले असून गुन्हयाचा अधिक तपास सुरु आहे. सदरची कारवाई ही पोलीस उपायुक्त गुन्हे अविनाश अंबुरे, सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीराचे पोलीस निरीक्षक प्रमोद बडाख, सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन सानप, पोलीस उपनिरीक्षक उमेश भागवत, संदीप शिंदे, सहायक फौजदार अशोक पाटील, अविनाश गर्जे, संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, पोलीस हवालदार मनोज चव्हाण, सचिन हुले, सुधीर खोत, अश्विन पाटील, सनी सुर्यवंशी, पोलीस शिपाई प्रशांत विसपुते, गौरव बारी, सौरभ इंगळे, धिरज मेंगाने म.सु.ब. किरण आसवले तसेच सहायक फौजदार संतोष चव्हाण सायबर गुन्हे शाखा यांनी केला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com